मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ८०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 24 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-80 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# सोने महागले

## दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर ग्राहकांचा हिरमोड



आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव : दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सोने खरेदी करण्यावर नागरिकांचा भर असतो. मात्र यंदा इस्त्रायल आणि हमास युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरात वाढ झाल्याचे चित्र असून गेल्या 36 तासांत जळगाव सुवर्णनगरीत शुद्ध सोन्यात प्रति तोळा 1000 रुपयांची वाढ झाली आहे. तर दोन दिवसांपूर्वी 60,000 रुपये असलेले सोने 61,000 हजारांवर पोहोचले आहे. त्यामुळे ग्राहकांचा चांगलाच हिरमोड झाला आहे.**

यंदा दसरा सण उत्साहात साजरा होणार असल्याची चिन्हे असून दुसरीकडे इस्त्रायल आणि हमास युद्धामुळे आंतरराष्ट्रीय गणिते कोलमडली आहेत. त्याचा परिणाम सोने चांदीच्या दरावर देखील झाल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे दसऱ्याच्या सणामुळे सोन्याच्या मागणीत वाढ झाल्यानेही सोन्याच्या दर वाढीवर परिणाम झाल्याचे दिसत आहे. जळगाव सुवर्णनगरीत गेल्या छत्तीस तासात शुद्ध सोन्यात प्रति तोळा 1000 रुपयांची वाढ झाली आहे. दोन दिवसांपूर्वी 60,000 रुपये असलेले सोने आज 61,000 हजार रुपये दरावर पोहोचले आहे. दसऱ्यानिमित्त जळगावसह संपूर्ण देशभरात अनेक ग्राहक सोने खरेदी करत असल्याने सोन्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून मंगळवारी सोन्याच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचे सोने विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

**बजेट बिघडले :** एकीकडे दसऱ्याला सोने लुटण्याची परंपरा आहे, त्याच पार्श्वभूमीवर अनेकजण नव्या गोष्टी खरेदी करून सुरुवात करतात . मग नवे कपडे, गोडाधोडाचे जेवण आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे सोने खरेदी होय . यंदा सोने खरेदीवर चांगलाच जोर पाहायला मिळत आहे . मात्र ग्राहकांचा सोने खरेदीकडे कल वाढत असताना दुसरीकडे दरात वाढ झाल्याने नागरिकांचा हिरमोड झाल्याचे पाहायला मिळत आहे .

सोन्याच्या दरात एक हजार रुपयांची वाढ झाल्याने बजेट बिघडले असले तरी दसऱ्या सणामुळे आणि काही दिवसांवर आलेल्या दिवाळीमुळे सोन्याचे दर वाढण्याची शक्यता असल्याने बहुतांश ग्राहकांनी रविवारी व सोमवारी सोने खरेदी करण्याला प्राधान्या दिल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले .



# ११ हजार १११ दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला मंदिर परिसर

## अनुराधा पौडवाल यांच्या कार्यक्रमात अलोट गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** श्री माता महाकाली महोत्सवात गायत्री परिवाराच्या वतीने 11 हजार 111 दिवे लावत दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी दिव्यांच्या रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला. तर सायंकाळी 7 वाजता युवा कीर्तनकार सोपान दादा कनेरकर यांचा कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. रात्री 9 वाजात सुप्रसिध्द गायिका अनुराधा पौडवाल यांचा भक्तीमय संगीत कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला भक्तांची अलोट गर्दी झाली होती. माता महाकाली महोत्सवाच्या चौथ्या दिवशी दिवसभरच विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात सायंकाळी ६ वाजता महोत्सव मंडप परिसरात गायत्री परिवारांच्या वतीने 11 हजार 111 दिवे लावत रोषणाई केले. त्यामुळे परिसर लखलखून निघाला होता. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉनसन आदींची प्रमूख उपस्थिती होती. सायंकाळी सात वाजता सोपान दादा कनेरकर यांचा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम पाहण्यासाठी विषेशतः युवकांनी मोठी गर्दी केली. तर रात्री 9 वाजता सुप्रसिध्द गायिका अनूराधा पौडवाल यांच्या कार्यक्रमाला सुरवात झाली या कार्यक्रमात भक्तांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने अनुराधा पौडवाल यांना मातेची मुर्ती देत सन्मानीत करण्यात आले.

**आ . जोरगेवार यांनी भक्तीचा धागा बांधला : आ . विजय वडेट्टीवार**

आ . जोरगेवार मातेचे मोठे भक्त आहे . त्यांनी चंद्रपूरात सुरु केलेल्या महोत्सवाला विशेष महत्व असून यातून चंद्रपूरकर मातेचा जागर करत आहे . त्यांनी या महोत्सवाच्या माध्यमातून चंद्रपूरकरांना भक्तीचा धागा बांधला असल्याचे प्रतिपादन विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केले . महोत्सवाच्या चौथ्या दिवशी त्यांनी येथे भेट दिली . या प्रसंगी ते बोलत होते . यावेळी महोत्सव समितीच्या वतीने त्यांचा महाकाली मातेची मुर्ती व चुनरी देत सत्कार करण्यात आला . माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनीही महोत्सवाच्या महोत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्यात यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, सचिव अजय जयस्वाल, बलराम डोडाणी, मिलिंद गंपावार, अशोक मत्ते यांच्यासह इतर सदस्यांची उपस्थिती होती .

**बाईपण भारी देवा या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद :**

महोत्सवात बाईपण भारी देवा . . मला पण आज बोलायचं आहे . . . या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाला महिला व मुलींचा मोठा प्रतिसाद लाभला . महिला आणि मुलींना मुक्त व्यासपीठ मिळावे यासाठी सदर आयोजन करण्यात आले होते .



# काँग्रेसचा तहसीलवर मोर्चा

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे नेतृत्व

आधुनिक केसरी न्यूज


**मूल :** शेतकऱ्यांच्या उभ्या पिकात घुसून नासधूस करणाऱ्या वन्य प्राण्यांनी तालुक्यातील लाखो शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान केले. तसेच मानव वन्यजीव संघर्षातून तालुक्यासह परिसरात अनेकांचे बळी गेले. मात्र वनविभाग या गंभीर बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. तर वनमंञ्याच्या स्थानिक मतदारसंघातील गंभीर प्रश्नांना घेऊन आज काँग्रेसने राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे नेतृत्वात तहसील कार्यालयावर हजारोंच्या उपस्थितीत जनाक्रोश मोर्चा काढत वनविभाग व सरकारचा निषेध नोंदविला.

सध्या शेती हंगाम हा अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांच्या शेतात हिरवे सोने म्हणजेच धान पीक उभे आहे. मात्र मुल तालुक्याला वन परिसर लागून असल्याने वनातील वन्य प्राणी यात मोठ्या प्रमाणात रान डुक्करांनी शेतात घुसून प्रचंड प्रमाणात हौदोस शेतपिकांचे नुकसान केले आहे. अशा गंभीर परिस्थितीत आधीच कर्जबाजारीमुळे त्रस्त असलेल्या बळीराजाला आता जीव देण्याची पाळी आली आहे. तर वन्य प्राण्यांच्या धुमाकूळ यात झालेली नासधूस याचे वनविभागा मार्फत पंचनामे केले जाते मात्र नुकसान भरपाई म्हणून केवळ तोकडे व अत्यल्प मदत देऊन वन प्रशासनामार्फत शेतकऱ्यांची थट्टा केली जाते. स्थानिक तहसिल कार्यालय समोर झालेल्या जाहीर सभेत संबोधित करताना राज्याचे विरोधी पक्ष नेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशात धर्मांधता पसरवून, जाती जाती मध्ये भांडणे लावून अराजकता माजविल्या जात आहे. अच्छे दिनाचे खोटे वादे करून महागाई वाढवून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले जात आहे. शेतकऱ्यांच्या जीवांना पैशाच्या तराजूत तोळता शेतीचे उध्वस्त करणाऱ्या व मनुष्याच्या जीवावर उठणाऱ्या वन्य प्राण्यांचा बंदोबस्त वनविभागाने स्वतः करावा अन्यथा धुडगूज घालणाऱ्या व हल्ले चढवणाऱ्या वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने प्रत्येक शेतकऱ्याला अधिकृत परवानगी देऊन शस्त्र वाटप करावे, असा सज्जड इशारा देत विरोधी पक्ष नेते वडेट्टीवारांनी वनविभाग व सरकारचा चांगलाच खरपूस समाचार घेतला.

यावेळी आ. विजय वडेट्टीवार आणि संतोषसिंह रावत हे बैलबंडीवर उभे होते. तहसीलदार मुल यांना लेखी निवेदन देण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने काँग्रेस नेते संतोषसिंह रावत, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार , शिवा राव, महिला काँग्रेसच्या माजी जिल्ह्याध्यक्ष चित्रा डांगे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेश अड्डुर, उपाध्यक्ष रमिज शेख, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश देवतळे, तालुकाध्यक्ष गुरू गुरनुले, बाजार समिती सभापती राकेश रत्नावार, उपसभापती राजेंद्र कन्नमवार, घनश्याम येनुरकर, शहर अध्यक्ष सुनिल शेरकी, युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष पवन निलमवार, महीला काँग्रेसच्या अध्यक्ष रूपाली संतोषवार, नलिनी आडपेवार यांचेसह मुल तालुका काँग्रेस चे पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, विविध सहकारी संस्थेचे सदस्य यांचेसह हजारोंच्या संख्येने शेतकरी शेतमजूर, महिला व युवक उपस्थित होते.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

शर्वरी. एक अत्यंत उत्साही आणि सतत हसतखेळत राहणारी तरुणी ! तिच्या लाघवी स्वभावाने सगळ्यांनाच आपलंसं करून घेणारी. तिचं बोलणं ऐकण्यासाठी सगळेच उत्सुक असायचे. पण अचानक एक मोठा अपघात झाला. शर्वरीची वाचा हरपली. बोलकी शर्वरी एकदमच शांत शांत राहू लागली. तिची जिवलग मैत्रीण सुषमा तिला भेटायला आली. शर्वरी काही बोलू शकत नव्हती. शर्वरीचे डोळे भरून आले. सुषमा आणि शर्वरी एकमेकींच्या गळ्यात पडून खूप रडल्या. शर्वरी थोडी शांत झाल्यावर सुषमाने आपल्या पर्समधून एक नवीकोरी डायरी आणि पेन काढले. शर्वरीच्या हातात ठेवले. एक पाटी पेन्सिल सुद्धा तिच्या हाती दिली. ' शर्वरी, काही काळजी करू नकोस. जशी तुझी वाचा अचानक अपघाताने गेली, तशीच ती एक दिवस परत सुद्धा येईल. मला विश्वास आहे. पण तोपर्यंत तू तुला जे काही सांगायचं ते या पाटीवर लिहून सांगत जा. जेव्हा तुला वेळ असेल तेव्हा तुझ्या भावना या डायरीत लिहीत जा. ' सुषमा म्हणाली. तशाही परिस्थितीत शर्वरीचा चेहरा खुलला. तिनं पाटीवर लिहिलं, ' सुषमा, बस थोडा वेळ. तू आल्यानं मला किती आनंद झाला ! आपण दोघी थोडी थोडी कॉफी घेऊ या. तू बोलत जा. मी लिहून सांगेन. ' शर्वरी आता बोलत जरी नव्हती, तरी तिला लिहिता येत असल्याने आपल्याला जे काही सांगायचं ते ती लिहून सांगायची. शर्वरीच्या मनात आलं, लिहिण्याची सोयच मानवाला उपलब्ध नसती तर ! कल्पनाच करवत नाही. आज चंद्र आणि मंगळावर पोहोचलेला आणि सूर्यावर चढाई करायची तयारी असलेल्या मानवाची प्रगती झाली असती ? निसर्गाने मानवाला काही वैशिष्ट्ये बहाल केली. त्यामुळेच तो इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आणि वरचढ ठरला. तो दोन पायांवर चालू शकतो आणि हातांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर आपल्या संरक्षणासाठी आणि प्रगतीसाठी करू शकतो. माणसाला बोलता येतं, तो विचार करू शकतो. त्याला हसता येतं. आपल्या हाताची पाचही बोटं त्याला हवी तशी वाकवता येतात, फिरवता येतात. त्याची ताकदवान मूठ बनवता येते. आणि त्याच वैशिष्ट्यपूर्ण हातांच्या बोटांचा वापर करून तो लिहायला शिकला.



## आनंदी पहाट

## सौदर्याचा शोध घेणे कधीही थांबवू नये, लांबवू नये

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सद्यःस्थितीत सर्वप्रथम धन, तन आणि मग मन असा प्राधान्यक्रम ठरत चालला आहे. आपल्याच मनाचा अनेकदा मनातल्या मनात, मनाप्रमाणे, मनमुराद काही वेळा मन मारूनही मनोमन आपण विचार करतोच असं नाही. शारीरिक सौदर्य खुलवणे हे जितकं आपल्याला प्रिय असतं, तितकंच किबहुना थोडं अधिकच मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं जरुरीचं असतं. आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचं वेगळेपण अनुभवताना आणि त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली आणि आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपआपल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजकता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या

आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकंच सुंदर सजवायचं, लवायचं असतं. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारं मन मात्र मोठं असावं लागतं. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर आपलं व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसं असू शकेल, हे ठरतं. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपलं व्यक्तिमत्व ऐट अणू शकतं. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारं मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकतं.



आधुनिक केसरी

**सावळीच माय | धन्य झालो |||**
सावळ्याचे रूप | वेड लावी जीवा ||
विठ्ठल माधवा | एक दिसे ||१||
चूकार वासरू | व्याकुळ हंबरे ||
मन हे बावरे | तैसे झाले ||२||
मृग तृप्त करी | चातकाची तृष्णा ||
तैसी माझ्या मना | आस तुझी ||३||
रामकृष्ण हरि | सापडली खूण ||
सावळा सगुण | विटेवरी ||४||
सावळ्याची बाधा | सावळा उपाय ||
सावळीच माय | धन्य झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळीं ॥ २३ ॥
पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्ठा कांहीं वमन । भागीरथीचें घेतां जीवन । त्याची कोये लघुशंका ॥ २४ ॥ एवं मळ मूत्र आणी वमन । हेंचि देहाचें जीवन । येणेंचि देह वाढे जाण । यदर्थी संशय नाहीं ॥ २५ ॥



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्‌गुरु पद के योग्य है, वह महर्षि परधान ।
ब्रह्म क सोत समाधि से, पूर्ण ज्ञान विज्ञान ।।२०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/०३/२०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तेच आप्त महर्षी सद्‌गुरु पदासाठी योग्य असतात ज्यांच्या अंतरंगात परमेश्वराची ज्ञान धारा प्रवाहित झाल्याने ज्ञान-विज्ञानाचे पूर्णत्व प्राप्त झालेले असते .



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ सहावी)

आधुनिक केसरी

देवी मातेची आयुधे भगवान शंकरांनी आपल्या शस्त्रसंभारातून देवी मातेला त्रिशूळ दिला. श्री, विष्णुंनी आपल्या चक्रातील काही तेज काढून एक नवीन चक्र तयार करून दिले. वरूण देवाने शंख दिला. अग्निने एक अजिंक्य व अचूक मारा करणारी दिव्य शक्ती दिली. पवन( वारा ) ने धनुष्यबाण दिले. इंद्र देवाने आपल्या बाणातील एक तेजस्वी बाण दिला. रणगर्जनेसाठी आपल्या ऐरावत हत्तीच्या गळ्यातील घंटा देवीला दिली. यमाने कालदण्डामधून ( काठी ) दण्डं वरूणाने पाशांकुश ( फास ) दिला. प्रजापतीने स्पटिकाची माळ दिली. ब्रम्हदेवाने देवीला कमंडलू दिला. सुर्याने देवीच्या त्वचेतील रोम छिद्रात आपली प्रकाश किरणे पसरवून तेज निर्माण केले.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

काळाने एक अजिंक्य तलवार व ढाल दिली. समुद्राने( क्षीरसागर ) दिव्य हार चूडामणी ,हातात रत्नजडित कांकणं आणि कानातील रत्नांनी जडवलेली कुंडले दिली. आभूषणामूळे रत्नांनी सजवलेली चंद्रकोर सर्व हातांना शुभ्र केयूर व पायात पवित्र नूपूरांची जोडी गळ्यात कंठा,मणिमाला प्रदान केल्या. साक्षात विश्वकर्माने हाताच्या सर्व बोटांना रत्नांनी मढवलेल्या सर्व अंगठ्या दिल्या.त्याच बरोबर एक अत्यंत धारदार फरशी दिली. बहुविध शस्त्रास्त्रे,अभेद्य कवच, कधीच कोमेजलेल्या न जाणा-या कमलपुष्पांच्या माला गळ्याची शोभा वाढवत होत्या त्याच्या सुगंधाने आसमंत दरवळून जात होता. सागराने विस्तीर्ण अत्यंत मनोहर व शोभिवंत पद्मपुष्पांचा हार दिला. हिमालयाने वाहन म्हणून अत्यंत उमदा सिंह व विविध रत्ने देवीला अर्पण केली. शेषनाग राजाने बहुमूल्य पृथ्वीमोलाचा नागहार देवीच्या चरणांवर अर्पण केला. सर्व देवतांनी आपल्या जवळची अत्यंत दुर्मिळ अशी रत्नभूषणे देऊन देवीचा सन्मान केला. अशी शस्त्रसंभार व रत्न अलंकार घातलेली देवीचे मातेचे लावण्यवती रूप पाहिल्यावर सर्व देवगणांनी देवी जगदंबेचा जयजयकार केला. आई राजा उदो उदो आई राजा उदो उदो.

## नाम हे परमात्मस्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम म्हणजे भगवंताचे नांव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळया नांवांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की भगवंत मुळात जो निर्गुण निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते त्याप्रमाणे वृत्तिचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्तिसुध्दा सूक्ष्म आहे म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत



होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळयांचा भावार्थ एकच आहे. अन्नाला स्वतःची चव असते त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत परंतु सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी स्वतःला विसरून जावे हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे. जसे आपले आपलेपण आपल्या नांवात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते परंतु देहबुध्दी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

## गहिनीनाथ

नांवें ठेवून तेथें यवन पुजारी ठेविले. कल्याण कलयुगीं बाबाचैतन्य यांची समाधि होती, पण तें नांव बदलून राववागशर असें नांव ठेविलें. गोरक्ष आपल्या आश्रमीं सटव्यांस ठेवून तीर्थयात्रेस गेला. नवनाथ बहुत दिवसपर्यंत तीर्थयात्रा करित होते. **क्रमशः**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# आरक्षणप्रश्नी सरकारने भूमिका स्पष्ट करावी

## नाना पटोले : मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल थांबवावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सध्या आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा व ओबीसी समाज एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. ट्रिपल इंजिन सरकारची आरक्षणप्रश्नी स्पष्ट भूमिका नसल्याने हा गुंता वाढत चालला आहे. समाजा-समाजात संशय वाढत चालला आहे. राज्य सरकारमध्येच आरक्षण प्रश्नावरून एकवाक्यता नाही. सरकारमधील मंत्री बोलतात एक व तर दुसरीकडे जाहिरात देऊन वेगळाच संदेश देत आहेत, ही गोंधळाची परिस्थिती निर्माण होण्यास ट्रिपल इंजिन सरकारच जबाबदार असून राज्य सरकारने याप्रश्नी ठोस भुमिका मांडून मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल थांबवावी, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. यासंदर्भात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यास सरकार कटिबद्ध आहे असे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री सांगत आहेत, मग मराठा समाजाला आरक्षण देण्यापासून त्यांना कोणी रोखले आहे का ? १० वर्ष होत आली केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे, आजपर्यंत त्यांनी मराठा आरक्षणाचा निर्णय का घेतला नाही? मागच्याच महिन्यात संसदेचे पाच दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले होते, या विशेष अधिवेशनात ५० टक्के मर्यादा काढण्याचा निर्णय केंद्र सरकारने



घेतला असता तर हा प्रश्न निकाली निघाला असता. आता मोदी सरकारचे काऊंटडाऊन सुरु झाले आहे, डिसेंबर महिन्यात संसदेचे शेवटचे अधिवेशन होईल त्यानंतर फेब्रवारी महिन्यात आचारसंहिता लागू शकते. एकाचे आरक्षण काढून दुसऱ्याला देणे हे चुकीचे आहे अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडलेली आहे ती योग्यच आहे, पण राज्य सरकारने भूमिका स्पष्ट करावी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय करतात ते कळतच नाही आणि दुसरे उपमुख्यमंत्री वेगळेच बोलतात. हे सर्व थांबवून ठोस भूमिका मांडली पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर 'जातनिहाय जनगणना करावी तसेच आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवा' या राहुल गांधी यांच्या मागणीला सर्वांनी पाठिंबा द्यावा, हे सर्व प्रश्न मार्गी लागू शकतात. छत्रपती संभाजीनगरमध्ये २५० कोटी रुपयांचे ड्रग्ज सापडले त्यावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले की, गुजरातच्या मुंद्रा बंदरात तीन-चार वेळा कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज पडकले गेले आहे. जेव्हापासून देशातील बंदरे मित्रोंना दिली गेली तेंव्हापासून देशभरात ड्रग्ज मोठ्या प्रमाणात येत आहेत. या सर्वांचे मुळ या खाजगी बंदरांमध्ये आहे. भाजपा सरकार तरुणांना ड्रग्ज व बिअर उपलब्ध करुन देऊन नशेत डुबवण्याचे पाप करत आहे. शिंदे सरकारने तर आता बियरच्या किमती कमी करण्यासाठी समिती नेमली आहे. उद्या हे सरकार रेशनवरही बिअर देईल, पाण्याच्या जागी बिअरच प्या, असेही धोरण आणतात की काय? असा प्रश्न आहे. भाजपाचे सरकार तरुण पिढीला बरबाद करण्याचे काम करत आहे हा आरोप नसून वस्तुस्थिती आहे, असेही नाना पटोले म्हणाले.



# लोहा बसस्थानकात पार्किंगविना बेहाल

## पार्किंगच्या जागेत कमर्शियल दुकाने

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लोहा शहरातील बसस्थानकात परिसरात बसस्थानक बांधकामावेळी प्रवाशांचे पार्किंगविना गैरसोय होऊ नयेत म्हणून मोठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. पण महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी काही लोकांना हाताशी धरून त्यांच्याकडून आर्थिक चेरीमेरी घेऊन पार्किंगच्या जागेत कमर्शियल दुकाने काढली यामुळे प्रवाशांना मोटारसायकल, गाडी पार्किंगला जागा अपुरी पडत आहे. यामुळे लोहा बसस्थानकात पार्किंगविना प्रवाशांचे प्रचंड बेहाल सुरू झाली आहे. लोहा शहरातून ३६१ नांदेड लातूर नॅशनल हायवे जातो लोहा शहर हे चार जिल्ह्यांना जोडणारा तालुका असल्याने येथील बसस्थानकात लोकांची रहदारी मोठ्या प्रमाणात आहे. राज्यासह परराज्यातून बसेस ये जा करतात. यामुळे बसस्थानक बांधकामावेळी मोठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. पण महामंडळातील वरिष्ठ अधिकारी यांनी काही लोकांना हाताशी धरून त्यांच्याकडून आर्थिक चेरीमेरी घेऊन पार्किंगच्या जागेत कमर्शियल तत्वावरील दुकाने थाटली. यामुळे पार्किंगची जागा कमर्शियल दुकानांमध्ये गेल्यामुळे पार्किंगसाठी जागा अपुरी पडू लागली आहे. यामुळे बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पार्किंगचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. प्रवाशांना बसस्थानकातून बाहेर ये जा करण्यासाठी वयोवृद्ध व्यक्तींना अडथळा होत आहे. पार्किंगला जागा उपलब्ध नसल्याने प्रवाशी कुठेही आपल्या गाड्या पार्किंग करत असल्याने येजा करणाऱ्या बसेसना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. कोणाची परमिशन घेऊन पार्किंगच्या जागेत दुकाने थाटली गेली ? विना परवानगी आर्थिक चेरीमेरी घेऊन पार्किंगच्या जागेत कमर्शियल दुकाने थाटणाऱ्या अधिकारी यांच्या विरोधात तात्काळ कारवाई करण्यात यावी व पार्किंगची जागा पुन्हा मोकळी करुन पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी जनतेतून केली जाते आहे.

या प्रकरणी महामंडळातील वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून काय कार्यवाही करण्यात येईल याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी महिलेचे साडेसात लाख फॉलोअर्स

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दनके**

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील एका शेतकरी महिलेचे फेसबुक या सोशल मीडियाच्या अकाउंटवर सात लाख साडेसात लाख फॉलोवर्स आहेत. दहावी शिक्षण झालेल्या सविता यांचे लग्न वीस वर्षांपूर्वी पेंडगाव येथ येथील सुनील टकले यांच्यासोबत झाले त्यानंतर त्या पती आणि सासू-सासऱ्या सोबत



शेतात जाऊ लागल्या त्यांच्याकडून त्या शेतातील कामे शिकल्या अल्पभूधारक शेतकरी असलेल्या सविता टाकले कमी खर्चात अधिक उत्पन्न कसे घ्यावे यासाठी विचार करू लागल्या. रासायनिक खत कीटनाशक याचा वापर केल्याने उत्पादन खर्च वाढतो हे त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी शेतात विविध प्रयोग सुरू केले. त्यातच त्या रासायनिक खता ऐवजी कंपोस्ट खत, गांडूळ खत रासायनिक कीटक नाशकऐवजी लिंबोळी अर्क दशपर्णी अर्काचा वापर करू लागल्या त्यांच्या या शाश्वत शेतीचा प्रयोगाला यश आले आहे आणि कमी खर्चात उत्पादन वाढल्याचे त्या सांगतात. फुलंब्री तालुक्यातील पेंडगाव येथील येथील सविता डकले या लग्नानंतर पतीसोबत शेतामध्ये रमल्या. शेती करताना त्यांना आलेल्या विविध समस्यावर त्यांनी उपाय शोधले कमी खर्चात अधिक खर्चात अधिक उत्पन्न घेण्यासाठी त्यांनी केलेल्या शाश्वत शेतीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. आपल्या ज्ञानाचा इतरांनाही लाभवा यासाठी त्यांनी फेसबुक वर एक अकाउंट सुरू केले. या फेसबुकच्या माध्यमातून ते शेतीविषयक त्या शेतीविषयक माहिती देतात त्यांच्या फेसबुक पेजवर साडेसात लाख फॉलोवर्स तयार झाले आहेत. त्यांनी अगोदर त्यांनी गावातील काही महिलांचा एक व्हाट्सअप ग्रुप बनवला होता सेवाभावी संस्थेच्या कामात त्या सहभागी झाल्या होत्या महिलांचा बचत गट स्थापन करून महिलांना प्रशिक्षण देणे बँक खाते उघडणे आधार लिंक करणे ऑनलाईन पेमेंट एप्लीकेशन असे वापरायचे या बाबत प्रशिक्षण देत असत. वूमन इन ॲग्रीकल्चर या नावाने सविता डकले यांनी सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंट अकाउंट सुरू केले. या अकाउंट वर त्या शेतीविषयक पोस्ट शेअर करून माहिती देतात.

# गुन्हा नोंद करण्यास प्रशासनाची टाळाटाळ; पंचायत समिती कळंबचा अजब कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** मौजे पाडोळी (ना) ता.कळंब येथील तत्कालीन सरपंच कमळाबाई श्रीकिशन सरवदे व ग्रामसेवक एस.एस. चोरमले यांना १५व्या वित्त आयोगातील ३,०४,१५६/- रक्कमेच्या अपहारास जबाबदार धरून त्यांचेवर गुन्हा नोंद करण्यासाठी दिनांक १४/१२/२०२१ रोजी गटविकास अधिकारी कळंब यांनी आदेश दिले होते परंतु दोन वर्ष झाले आणखी नोंद झालेला नाही. तसेच गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ होत आहे म्हणून मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव यांनी दिनांक १५/२/२०२२ रोजी गटविकास अधिकारी कळंब यांना आदेशीत केले होते त्यांच्याही आदेशाला प्रशासनाने केराची टोपली दाखवली आहे. शेवटी तक्रारदार दगडू मारूती अवधूत (उपसरपंच) पाडोळी यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांना निवेदन दिले आहे. निवेदनाची तात्काळ दखल घेऊन दिनांक २०/१०/२०२३ रोजी जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. धाराशिव यांना सदरील प्रकरणात तात्काळ कार्यवाही करण्याचे पत्र दिले आहे. यावरून गटविकास अधिकारी कळंब हे गुन्हेगाराला पाठीशी घालत असल्याचे दिसून येत आहे.गुन्हा नोंद न झाल्यास तक्रारदार श्री. दगडू मारूती अवधूत हे न्यायालयात दाद मागणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.




# गौतमींचा भाजपला रामराम

आधुनिक केसरी

तामिळनाडूतील प्रसिद्ध अभिनेत्री गौतमी तडीमल्ला यांनी २५ वर्षं भाजपाच्या सक्रीय सदस्य राहिल्यानंतर पक्षाला रामराम ठोकला आहे. पक्षातील कार्यपद्धती, नेतेमंडळींची वागणूक व आपल्याला अजिबात सहकार्य मिळत नसल्याची तक्रार करत त्यांनी पक्षातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले आहे. एक्सवर (ट्विटर) त्यांनी यासंदर्भात सविस्तर पत्रच पोस्ट केले असून त्यामध्ये त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. आपल्याला फसवणाऱ्या व्यक्तीलाच पक्षातील काही व्यक्ती सहकार्य करत असून आपल्याला मात्र कोणतीही मदत केली जात नाही, असे त्यांनी या पत्रात नमूद केले आहे. अभिनेत्री गौतमी तडीमल्ला यांनी नेमके काय घडले याविषयी माहिती दिली आहे. आपण जड अंत:करणाने आणि प्रचंड मोठ्या भ्रमनिरासामुळे पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत आहोत. २५ वर्षांपूर्वी मी भाजपामध्ये दाखल झाले होते. माझ्या वैयक्तिक आयुष्यात आलेल्या असंख्य समस्यांवर मात करून मी पक्षासाठीची बांधिलकी जपली. पण तरीही आज माझ्या आयुष्यातल्या संकटाच्या काळात मला पक्षातून कुणाचाही पाठिंबा नाही. पाठिंबा तर लांब राहिला, पण उलट माझी आयुष्यभराची कमाई फसवणुकीने लाटणाऱ्या व्यक्तीला पक्षातील बरेच लोक मदत करत आहेत, असं गौतमी यांनी आपल्या जाहीर पत्रात लिहिले आहे. मी १७ वर्षांची असताना अभिनयाला सुरुवात केली. गेल्या ३७ वर्षांपासून मी अथकपणे काम करत आहे. जेणेकरून माझ्या मुलीचे आयुष्य सुखात जावे. पण सी. अलगप्पन या व्यक्तीने माझी फसवणूक करून पैसे, मालमत्तेची कागदपत्र स्वत:च्या ताब्यात घेतली, असा आरोप त्यांनी केला आहे. भिनेत्री गौतमी यांनी आपली फसवणूक नेमकी कशी झाली? यासंदर्भातही पत्रात उल्लेख केला आहे. अलगप्पन याच्याशी माझी २० वर्षांपूर्वी ओळख झाली. एक चांगला माणूस म्हणून मी त्याच्यावर विश्वास ठेवला. त्या विश्वासाच्याच आधारावर मी त्याच्याकडे माझ्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे सोपवली. मला व माझ्या मुलीला कौटुंबिक मित्रत्वाची वागणूक देऊन त्याने मला फसवले, असे गौतमी यांनी नमूद केले आहे. अभिनेत्री गौतमी तडीमल्ला यांनी सप्टेंबर महिन्यात चेन्नई पोलिसांत सी अलगप्पन व त्याची पत्नी ए. एल. नाकल यांच्याविरोधात २५ कोटींची मालमत्ता लाटल्याची तक्रार दाखल केली आहे. २५ वर्षं प्रामाणिकपणे पक्षाचे काम केल्यानंतर पक्षाकडून कोणतीही मदत न मिळणे हे माझ्यासाठी धक्कादायक आहे.

# धर्मांतराने काय दिले...?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अशोक विजया दशमी या दिवशी लाखों अनुयायां सोबत धम्मदिक्षा घेऊन आज करोडो लोकांना धम्माचा मार्ग दिला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना धर्मांतर का करावे लागेल? आणि धर्मांतराने काय दिले याचे उत्तर शोधले तर बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतरनाने सामाजिक, वैचारिक व आर्थिक क्रांतीच झाली हेच निष्पन्न होते. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतरनाचा निर्णय घेतला कारण तेथे जातीभेदाचे, अस्पृश्यतेचे मुळ खोलवर पोहचले होते. अंधविश्वास व पाखंड यामुळे मानसाला मानसिक गुलाम बनवून हक्क अधिकार व विकासाची दारे बंद करून विषमतेच्या नावाखाली प्रत्येक मानसाचे शोषण होत होते.**

एकच वर्ण बहुसंख्य लोकांचे शोषण करून स्वतः चे पोषण करत होता. सर्व सत्ता, संपत्ती आणि वर्चस्व एकाच वर्णाचे राहावे म्हणून इतरांना हिन लेखणारी निच माणसिकतेच्या लोकांनी सामाजिक वातावरण दुषीत करून माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते. कुत्र्याला मिरण्याचा थाट व माणसाला माणसाचा बाट अशी एकदम खालच्या स्थराला धर्ममार्तंड लोकांची मानसिकता पोहचली होती. ही मानसिकता समता बंधुता, न्याय व स्वातंत्र्य नाकारणारी होती. माणसाला प्रगती करायची असेल तर समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य दिले तरच तो सर्व क्षेत्रात प्रगती होऊ शकते आणि मुळात हेच धर्मात नाकारले होते. जातीव्यवस्था मजबूत असल्याने माणासाला स्वतंत्र अशी ओळख नव्हती. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतरनाचा निर्णय घेऊन लोकांना मानसिक स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय, अस्तित्व व स्वाभिमान याची जाणीव करून तर दिली हा तर जागतिक इतिहास आहेच. परंतु अजून सर्वात मोठा अमुलाग्र बदल म्हणजे धर्मांतरीत लोकांमध्ये वैचारिकता वाढीला लागली.

धर्मांतरीत लोक राष्ट्र हित, भारताचे संविधान, सामाजिक समस्या व त्या सोडविण्यासाठी समोर यायला लागले, सामाजिक न्यायासाठी रस्त्यावर यायला लागले. अंधविश्वास व पाखंड बाजूला सारून भोंदुगीरी चे व भक्तीच्या नावाखाली मध्यस्थी चे वर्चस्व कमी झाले. दैववादी विचारसरणी बदलून कर्मवादी व विज्ञानवादाची बनले. या सर्व बदलामुळे धर्मांतरीत लाखो लोकांना स्वतः च्या अस्तित्वा बरोबरच मान सन्मान ही मिळायला लागला. जातीव्यवस्थे मध्ये ज्यांना सर्व हक्क अधिकार नाकारले होते तेच लोक धर्मांतरनामुळे देशाचे सामाजिक व राजकीय नेतृत्व करायला लागले. बुद्ध धम्माची दिक्षा देऊन बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी करोडो लोकांच्या डोक्यातील अंधविश्वास, पाखंड, बाजूला काढून त्यांना शिक्षण व विज्ञानाचा मार्ग दिला. अंधविश्वास, पाखंड, होम-हवन, पुजा अर्चा यांच्या नावाखाली होणारी आर्थिक पिळवणूक थांबून तोच पैसा शिक्षण, आरोग्य यावर खर्च व्हायला सुरुवात झाली. शिक्षणाने मस्तक सुधारते व सुधारलेले मस्तक सर्वांना जागृत करते. आज बुद्ध धम्मीय लोक सामाजिक समता, न्याय, बंधुता, भारतीय संविधान यावर बोलुन मानसाच्या विकासाचे मत मांडतात परंतु आजही देशात एवढी जातीयता आहे की त्यावेळी सर्वात विद्वान असलेले, भारतीय संविधानाचे शिल्पकार असलेले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य केवळ जातीमुळे दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. यावरून आजही गुणवत्ता, चांगले काम, विद्वता यांना काहीच महत्त्व देत नाही तर महत्व दिले जाते जाती धर्माच्या नावाखाली लोकांचे शोषण करणाऱ्यांना, महत्त्व दिले जाते भोंदुगीरी करणाऱ्यांना, महत्त्व दिले जाते जादु टोणा करून राख देणाऱ्यांना, कारण धर्मात राहून आजही विषमतेचे विचार बाजूला गेले नाहीत. उलट विषमता आजही खोलवर आहे फक्त प्रत्यक्ष दिसत नाही. उलटपक्षी बौद्ध धम्मीय लोक बघितले तर जे सत्य आहे, ज्या लोकांनी माणसाच्या कल्याणासाठी काम केले त्या सर्व महापुरुष व संताना आपल्या प्रेरणास्थानी माणतात, माणसाच्या कल्याणासाठी ज्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या संत महापुरुषांच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार करतात. कोणत्याही जातीवर अन्याय झाला तरी बौद्ध धम्मीय



लोक न्यायाच्या बाजूने उभे राहतात. आजही हिंदु धर्मातील अनेक जातीवर अन्याय अत्याचार हिंदु धर्मीय लोकांकडून च होतो. परंतु अशा पिडीत लोकांच्या न्यायासाठी बौध्द धम्मीय लोक रस्त्यावर उतरतात, आंदोलन करतात, व बाजु उचलून धरतात. हा मनाचा मोठेपणा व सामाजिक न्यायाची भावना केवळ धर्मांतर केल्यामुळे निर्माण झाली आहे. अंधविश्वास, पाखंड, थोतांड यावरचा खर्च कमी होऊन आणि भक्तीच्या नावाखाली मध्यस्थी करणाऱ्याची दुकानदारी बंद करण्याचे क्रांतिकारी काम बौद्ध धम्मीय लोकांनी केले. बौद्ध धम्मीय लोकांच्या घरात अंगारा, धुप, व अंधविश्वास पसरवणारे साधने न दिसता पुस्तकाचे कपाट मात्र नक्कीच दिसते. बौद्ध धम्मीय लोकांच्या घरात पुस्तकाचे भंडार आहे. ज्याला शिक्षण, वाचण आणि पुस्तक याचे महत्त्व कळत नाही त्यांना पुस्तकाचे महत्त्व कळणारच नाही परंतु जागृती, विज्ञानवाद आणि सामाजिक विषय जेथे येतील तेथे बौद्ध धम्मीय लोक आघाडीवर आहेत यामध्ये कुठेही शंका नाही. हजारो वर्षांपासून डोक्यात अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी पेरली गेली ती एकाच धर्मांतरनाने एकदम दुर गेली. आजही काही लोकांच्या मनामध्ये भोंदुगीरी, अंधविश्वास आहे तोही निघून जाईल परंतु आपण तुलना केली तर बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार रोज होत नाही, पण अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी विषयी सकाळी उठल्यापासून तर झोपेपर्यंत लोकांच्या डोक्यात टाकले जाते, म्हणून काही लोक अंधविश्वासाकडे वळलेले आहेत हे नाकारता येत नाही परंतु प्रमाण जर बघितले तर आज देशाला तर्क, विज्ञान आणि विचार फक्त आणि फक्त बौद्ध धम्मच देऊ शकतो हे कोणीच नाकारू शकत नाही. बौद्ध धम्मीय लोक नियमित पणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करत नाही तरीही हा अमुलाग्र बदल केवळ आणि केवळ पुस्तकांमुळे व शिक्षणामुळे झाला. आज ज्या ठिकाणी बौद्ध लोक जातात त्या ठिकाणी पुस्तकाची विक्री करोडो रुपयाची होते. जेव्हा जेव्हा राष्ट्र हित, महिलांचा प्रश्न, शिक्षण, आरक्षण, संविधान आणि धार्मिक प्रश्न उपस्थित केले जातात तेव्हा बौद्ध धम्मीय लोक सत्य व न्यायाची बाजू घेऊन आंदोलन मजबूत करतात. परंतु ज्यांच्या डोक्यात विषमता आजही कायम आहे, ज्यांना आजही थोतांड आणि काल्पनिक गोष्टी खऱ्या वाटतात त्यांना सत्य आणि न्यायाची बाजु कशी पचेल हाच सर्वात मोठा प्रश्न आहे. धर्मांतरनाने एक वैचारिक फळी तयार होऊन प्रबोधनाची सुरवात झाली आहे. धर्मांतरनामुळे अस्तीत्व व स्वाभिमान निर्माण झाल्याने बौद्ध धम्मीय लोकांकडे स्वतःच्या मालकीच्या शाळा, कॉलेज, बँका व इतरही आर्थिक उत्पन्नाचे स्वतः चे स्त्रोत तयार झाले आहेत. वैचारिक पातळी वाढल्यामुळे अनेक ठिकाणी बौद्ध धम्मीय लोकांना मार्गदर्शक म्हणून सुद्धा नेमणूक झालेल्या आहेत. अनेक वैचारीक, बौद्धिक क्षेत्रात अध्यक्ष पदही बौद्धांकडे द्यावे लागले. आज बौद्ध जरी उच्चारला तर भोंदुगीरी करणारा, महिलांची दिशाभूल करून दानाच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक करणारे लोक दुर पळतात. भविष्य पाहणारे, जन्मकुंडली तयार करणारे बौद्ध वस्तीत जाणे जाणीव पुर्वक टाळतात याचाच अर्थ आज बौध्द लोक जागृत होऊन अंधविश्वास मानत नाहीत व जन्म कुंडली आणि भविष्याचा यांच्या वर काहीच परिणाम होत नाही हेच सिद्ध. अंधविश्वास बाळगून मानसिक गुलाम होऊन दैववादी होऊन आपल्याच प्रगतीला बंधने घातल्या पेक्षा अंधविश्वास झुगारून विज्ञानवादी व कर्मवादी होऊन स्वतः चे भविष्य स्वतः घडणारेच नेतृत्व करत असतात आणि हिच शिकवण धर्मांतरनाने दिली. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतरनाची दखल संपूर्ण जगाने घेतली कारण सर्वात विद्वान व्यक्तीने स्वतः साठी नव्हे तर समाजाच्या कल्याणासाठी केलेले धर्मांतर ही बाब जागतिक प्रेरणादायी ठरली. आणि ठिकाणाहुन प्रेरणा घेऊन आज करोडो लोकांमध्ये वैचारिक, सामाजिक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय बदल झाले हेच तर धर्मांतराने दिले.धर्मांतरना कडे जर जनहित लक्षात घेऊन बघितले असते तर आज भारत जगात महाशक्ती म्हणून उदयास आला असता परंतु एवढ्या मोठ्या क्रांतीलाही जातीचे स्वरूप दिले म्हणून एका जातीचे लोक धर्मांतरीत झाले परंतु नेतृत्व आजही देशाचे करत आहेत म्हणूनच तर धर्मांतर बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि आज उद्देश्यही पूर्ण झालेला दिसत आहे.

# वायू प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर परिणाम



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई, उरण या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे. याआधी हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरल्याने दिल्लीची काय अवस्था झाली हे आपण पाहिलेच आहे आता मुंबईही त्याच मार्गाने चालली आहे. विशेष म्हणजे सफर या संस्थेने केलेल्या पाहणीत मुंबईतील हवेच्या गुणवत्तेची पातळी दिल्लीपेक्षाही जास्त खराब आहे असे दिसून आले आहे हे अधिक चिंताजनक आहे. मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे.**

मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात प्रामुख्याने सांगता येण्यासारखे कारणे म्हणजे वाढते औद्योकीकरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे ही आहेत. मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घासरण्यामागे देखील हेच कारणे आहेत. याशिवायही आणखी काही कारणे असू शकतात. दरवर्षी दिवाळी नंतर हवेच्या गुणवत्तेची पातळी खालावल्याची बाब समोर येते कारण देशभर दसरा - दिवाळीमध्ये फटाके उडवली जातात फटाक्यांच्या प्रदूषणामुळे हवेची पातळी खालावते. यावर्षी मात्र दिवाळी अधिक हवेची गुणवत्ता खराब झाली आहे. आजच ही अवस्था असेल दिवाळी नंतर काय अवस्था असेल याचा विचारच न केलेला बरा. म्हणूनच मुंबईतील या दूषित हवेचे गांभीर्य ओळखायला हवे. मुंबईची ही दूषित हवा कमी करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करायला हवेत. मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे. मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला असल्याने सरकारने दिवाळीत वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होणार आहे त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावे लागणार आहे.

जर एखाद्या व्यक्तीने श्वास घेतलेले प्रदूषक मानवी शरीरात खोलवर शिरले आणि रक्तप्रवाहात पोहोचले, तर अनेक आरोग्य-संबंधित समस्या अनुभवल्या जाऊ शकतात ज्यासाठी भारतातील सर्वोत्तम हृदयरोग तज्ञांकडून मूल्यांकन आवश्यक आहे. अवयवांपर्यंत पोचणाऱ्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत असल्याने रक्तनिर्मिती कमी होऊ शकते. शिसे किंवा कार्बन मोनॉक्साईड विषबाधामुळे स्नायूंच्या समस्या, हालचाल समस्या, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार होऊ शकतात जे तुम्हाला सर्वोत्तम हृदय आणि फुफ्फुसांची केअर रुग्णालये शोधण्यास भाग पाडू शकतात.

गरोदरपणात वायू प्रदूषणाच्या संपर्कात आलेल्या



महिलांच्या रक्तातील विषारी रसायनांची पातळी वाढलेली असते ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीवर ताण येतो. प्रदूषित हवा, जेव्हा गर्भापर्यंत पोहोचते तेव्हा कमी वजन किंवा अकाली जन्म यासारख्या समस्या उद्भवू शकतात. पुढील परिणाम जे अनुभवले जाऊ शकतात त्यात कायमस्वरूपी न्यूरोलॉजिकल समस्या जसे की शिकण्याची कमतरता आणि कमी झालेला IQ यांचा समावेश होतो. हवेतील कण श्वास घेतल्याने अल्झायमरचा धोकाही वाढतो.चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. वाढते वायू प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई - दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच आहे असे नाही संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समाजसेवक पुरस्काराने सुनील रासकर सन्मानित

## स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टकडून सामाजिक कार्याची दखल

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सामाजिक बांधिलकी जपत नेहमी सामाजिक कार्यात कार्यरत असणारे खेड बु!ता. खंडाळा येथील एक तरुण सामाजिक कार्यकर्ते सुनील बाळासो रासकर यांना स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने कराड येथे समाजसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा सन्मान देतेवेळी प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे, सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, आप्पासाहेब कदम, पंजाबराव देसाई, चंद्रकांत चव्हाण, डॉ. संदीप डाकवे, रेश्मा डाकवे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. या सन्मानाबद्दल सुनील रासकर यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. खा. श्रीनिवास पाटील,आ.मकरंद पाटील, मिलींद पाटील, आ.शशिकांत शिंदे,दत्तानाना ढमाळ, डॉ. नितीन सावंत, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती रमेश धायगुडे,माजी सदस्य बापुराव धायगुडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र नेवसे, नारायण धायगुडे, सुरेश रासकर, सरपंच गणेश धायगुडे, उपसरपंच धनश्री रासकर,
ग्रामपंचायत पदाधिकारी उमा रासकर,
विकास माने, माजी सरपंच राजेंद्र हाके,माजी उपसरपंच भगवान ठोंबरे, माजी उपसरपंच नितीन रासकर, ॲड.वैभव धायगुडे, साथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष कय्युम मुल्ला, जावेद पटेल, सागर धायगुडे पाटील, ऋषिकेश धायगुडे, रमेश जगन्नाथ रासकर, अनिल दिनकर रासकर, सिध्देश्वर उद्योग समुहाचे प्रमुख संजय (बापू) रासकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सुनील रासकर यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिलेल्या आहेत. सुनील रासकर गेली १७ वर्ष सामाजिक कार्य करत आहेत. त्यांचे हे कार्य निस्वार्थी भावनेने सुरू असते. प्रत्येकासोबत सहकार्याची भावना ठेवत असतात.
माळी सेवा संघ महाराष्ट्र राज्य चे तालुकाध्यक्ष पद, श्री संत सावता माळी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे खंडाळा तालुका संपर्कप्रमुख पद,साथ प्रतिष्ठान संघटनेचे मुख्य कार्यकारिणी सदस्य पद,ग्रामसुरक्षा दलाचे सदस्य पद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य पद तसेच राष्ट्रवादी काँग्रेस ग्राहक संरक्षण समितीचे खेड बु! अध्यक्ष अशी अनेक पदे भुषवत असताना सुनील रासकर यांनी सामाजिक बांधिलकी जपलेली आहे.विविध सामाजिक उपक्रम ते समाजहिताचे राबवत असतात. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राबवून ५०० पेक्षा जास्त लोकांना लाभ मिळवून दिला आहे.थोर समाज सुधारकांचा जयंती कार्यक्रम घेतांना त्यांच्या कडून शालेय विद्यार्थ्यांना ट्राफी व सन्मान पत्र देऊन प्रोत्साहन दिले जात असते. सुनील रासकर हे विविध स्वरूपाचे कार्य करत असल्याने त्यांच्या कार्याची दखल पाटण तालुक्यातील डाकेवाडी गावचे डॉ. संदीप डाकवे यांनी स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून समाजसेवक पुरस्काराने घेतल्याबद्दल सुनील रासकर यांनी त्यांचे विशेष आभार मानले आहेत. सुनील रासकर यांनी आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळविलेले आहे.आज स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टकडून आणखी एका पुरस्काराची भर पडलेली असून सामाजिक कार्य करण्याचे अजून बळ मिळाले असल्याचे सुनील रासकर यांनी म्हटले आहे.

# धुळ्याजवळ नाल्यात गांजाची शेती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील वेल्हाणे (कुंडाणे) शिवारातील एका शेताच्या बाजूला असलेल्या नाल्यामध्ये गांजा शेती केली जात असल्याचे उघड झाले असून स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून दोन लाख २० हजार १०० रुपयांची गांजाची झाडे जप्त केली. या प्रकरणी कुंडाणे येथील संशयिताविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांचे पथक कुंडाणेतील परशुराम ठाकरे हा कसत असलेल्या शेतात पोहोचले. या ठिकाणी शेतालगत असलेल्या नाल्यात गांजाची बेकायदेशीरपणे लागवड करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी गांजाची झाडे जप्त केली. झाडांचे वजन ५५ किलो, ५५ ग्रॅम असून प्रतिकिलो साधारणपणे चार हजार रुपये किंमत असल्याची नोंद पोलिसांनी घेतली आहे. ठाकरेविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, अमली पदार्थ ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडतील, त्या ठाण्याच्या निरीक्षकावर कारवाई करण्याच्या लेखी सूचना आपण यापूर्वीच दिल्या असून परिक्षेत्रात कुठेही अमली पदार्थांची गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक बी. जी. शेखर पाटील यांनी दिला आहे.

# मोहन अग्रवाल यांच्या पुढाकाराने सिमेंट रोड व नालीचे काम पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** परतूर शहरातील माऊली नगर या भागामध्ये अनेक वर्षापासून नागरिकांना रस्ते व नाली नसल्यामुळे समस्या निर्माण झाली होती. याबाबत नगरपालिकेकडे अनेकदा मागणी करूनही कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. त्यानंतर या भागातील नागरिकांनी मोहन अग्रवाल शिवसेना जिल्हाप्रमुख जालना यांच्या कडे सर्व समस्या मांडल्या जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांनी पुढाकार घेऊन मुख्यमंत्री मुख्यमंत्री माननीय नामदार श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्याकडून या भागातील रस्ते व नाल्यासाठी 40 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून या भागातील रस्ते व नाल्याची लोकांची मागणी पूर्ण करून दिली. त्याबद्दल या भागातील नागरिकांनी जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांचा सत्कार करून त्यांच्या हस्ते कामाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळेस त्यांच्या समवेत शिवसेनेचे तालुकाप्रमुख अमोल सुरुंग, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, वैद्यकीय कक्षप्रमुख शिवाजीराव तरवटे, शिवसेना शहर प्रमुख दीपक हिवाळे, कैलास चव्हाण, कैलास चव्हाण, मधुकर निलेवाड, कैलाश पुरी, तेजस अग्रवाल, यांच्यासह या भागातील अंकुश सांगुळे, अभिजित सुरवसे, जाधव सर, उमाकांत ठाकरे सर, श्रीकांत ठाकरे सर, वायाळ सर, फुफाटे साहेब, शिंदे सर, हुळगुंडे सर, नामदेवराव साकळकर, भागवत भापकर, वाघ सर, कांगणे सर, भापकर साहेब, श्रीकांत ठाकरे सर, डॉ.काकडे सर सह महिला वर्ग उपस्थित होते.






महाराष्ट्र Business Katta












# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : हिंदुत्वाचे चैतन्यपर्व



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी


**आधुनिक भारतीय इतिहासामध्ये रचनात्मक कार्याद्वारे एक नवा आदर्श निर्माण करण्याचे श्रेय रा.स्व.संघाकडे जाते. संघाबरोबर आपण स्थापन झालेल्या अनेक संघटना इतिहासात जमा झाल्या आणि काहींची अस्तित्व असले तरी ते नाममात्र आहेत. गेल्या 100 वर्षांतील संघाच्या ऐतिहासिक वाटचालीचे आणि स्थित्यंतराचे आकलन केले असता संघ जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संस्था आहे. तशा प्रकारे केली आहे, त्याचे आकलन केले असता अनेक पैलू समोर येतात. ठोस तत्वज्ञान, कुशल संघटन चातुर्य अिाण समर्पीत प्रचारक यामुळे संघाने आधुनिक भारताच्या इतिहासावर अमीट ठसा उमटविला आहे.**

रा.स्व. संघाच्या स्थापनेला 1925 साली 100 वर्ष पूर्ण होत आहेत. यावर्षीच्या विजयादशमीला शताब्दी वर्षाला प्रारंभ होत आहे. त्यानिमित्ताने संघाच्या कार्याची ओळख करून देणारी ही लेखमाला विजयादशमीपासून प्रकाशित करीत आहोत.

जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था म्हणून राष्ट्रीय स्वयं सेवक संघाने नावलौकिक संपादन केला आहे. प्रिती गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे जगातील सर्वात मोठ्या स्वयं सेवी संस्थेने भारतीय लोकशाहीचा चेहरा कसा बदलला आहे, ते समजावून घेणे आवश्यक आहे. कारण 1977, 2014, 2019 मधील राजकीय चित्र स्पष्ट करण्यात आणि लोकशाही स्थिर करण्यास संघाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. (डी.एन.ए. इंडिया 15 मे 2014) एक काळ असा होता की, स्वयंसेवी संस्थाकडे दबाव गट म्हणून पाहिले जात असे व त्यांच्या कार्याची उपेक्षा केली जात असे. परंतु एखाद्या संघटनेच्या जन्मापासून तिच्या वर्तमान काळातील वाटचालीचा अभ्यास केल्या असता, संघटना कशी जन्माला आली, कशी वाढली, अनंत अडचणीवर मात करून संघटनेने आपला ध्येयवाद, कार्यप्रमणाली आणि तत्त्वज्ञान काळाप्रमाणे बदलून देशाची व मानव समाजाची कशा प्रकारे सेवा केली ते लक्षात येऊ शकते. नानाजी देशमुख यांनी लिहिलेल्या आर.एस.एस. 'अ व्हिक्टीन ऑफ स्लेंडर' या ग्रंथामध्ये संघ अपप्रचाराला कसे तोंड द्यावे लागले ते सांगून संघाची बाजू मांडली आहे.

1925 साली डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी या संघटनेची नागपूर येथील मोहिते मळ्यामध्ये स्थापना केली आणि या संघटनेचा आज विशाल वटवृक्ष झाला आहे. तेथे संघाची पहिली शाखा भरली होती. संघटनेचा ध्येयवाद हा हिंदु राष्ट्रवाद या संकल्पनेवर आधारलेला आहे आणि संघाचे एकनिष्ठ स्वयंमसेवक हे या संघटनेचे आधार स्तंभ आहेत. संघाच्या कार्याचा विस्तार केवळ भारतामध्येच नव्हे तर, जगातील विविध देशात झाला आहे. त्यामुळे संघ परिवाराच्या शाखांचा नित्य विस्तार होत आहे. भारतीय समाज जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करून संघाने आपल्या सेवा कार्याचा गुणात्मक दृष्टिने विस्तार केला आहे. एक सेवाभावी संघटना म्हणून संघाने 1962 च्या चीनी आक्रमणापासू ते 2019 च्या करोना महामारी पर्यंत देशाची व समाजाची विविध माध्यमातून सेवा बजावली आहे. भारताचे गृहमंत्री व उप-पंतप्रधान सरदार वल्लभ भाई पटेल यांने दुसरे सर-संघचालक गोळवलकर गुरूजी यांना भारत सरकाचे प्रतिनिधी म्हणून काश्मिरचे राजे हरिसिंग यांच्याकडे बोलणी करण्यास पाठविले होते. तेंव्हा प्रा. बलराज मधोक आणि बच्छराज व्यास हे दोन प्रचारक त्यांच्या सोबत होते. गुरूजींनी चतुराने शिष्टाई करून राजा हरिसिंग यांचे मन वळविले व त्यांनी भारतीय संघ राज्यात विलिन होण्याचे मान्य केले. राष्ट्रीय एकात्मतेसाठी संघाने दिलेले हे मोठे योगदान होय. संघाने 1962 साली सरकारच्या निमंत्रणावरून राष्ट्रीय संचलनात भाग घेतला होता. नित्य शाखांची सतत होत असलेली वाढ आणि स्वयंम सेवकांच्या कार्याचा विविध क्षेत्रातील विस्तार पाहता, संघाची वाटचाल कोणालाही थक्क करणारी आहे. अमेरिकेच्या फिलाडेफिया विद्यापीठातील प्रा. क्रेज बेक्स्टर यांनी संघाच्या निखळ ध्येय वादातून भारतामध्ये पर्यायी राजकीय संस्कृति विकसित झाली असल्याचे नमूद केले आहे.

**विजयादशमी दिनी स्थापना :** विजयादशमी हा प्रभूराम चंद्राच्या आयोध्येतील पुर्नआगमणाचा शुभदिवस मानला जातो. या दिवशी सत्याने असत्यावर आणि न्यायाने अन्यायावर विजय मिळविला म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे. या शुभमुहूर्तावर दि.27 सप्टेंबर 1925 रोजी स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वंयमसेवक संघाची वाटचाल पाहता, शताब्दीच्या दिशेने घोड दौड चालू आहे असे म्हणावे लागेल. "हिंदुत्त्व हेच राष्ट्रीयत्त्व'', असे सूत्र घेऊन चारित्र संपन्न ध्येयवादी, हिंदी तरूणांची संघटना उभी करून, हिंदु राष्ट्र स्थापन करण्यासाठी अनुशासन आणि प्रखर ध्येयवादाच्या आधारे प्रयत्नांची पराकाष्टा करणे, असा संकल्प पू. डॉ. हेडगेवार यांनी केला. संघ स्थापनेसाठी झालेल्या पहिल्या बैठकित डी.एस. मुंजे, गणेश सावरकर, एल. व्ही. परांजपे व डी.बी. ठोलकर हे चार प्रमुख नेते उपस्थित होते. शिवाय हेडगेवार यांना माननाऱ्या उत्साही तरूण कार्यकत्यांचा मोठा समुदायही या दिवशी उत्साहाने उपस्थित होता.



मोहन भागवत

डॉ. हेडगेवार यांनी स्वातंत्र्य पूर्व काळात भारतीय समाजाच्या स्थिती व गतीचे सूक्ष्म अध्ययन करून,भारताला भक्कम शक्तीशाली राष्ट्र बनविण्यासाठी, हिंदुत्त्व संकल्पनेचा परिपोष केला. प्राचीन भारतीय संस्कृति आणि सभ्यता यावर आधारलेल्या श्रेष्ठ मानवी मुल्यांची जोपासना करण्याचा प्रयत्न संघ करत आहे, तो डॉक्टरांच्या समाजशास्त्रीय दूर दृष्टीमुळे. एकीकडे इतिहासाचे नवे ठोस अकलन आणि दुसरीकडे प्रगत सामाजिक विज्ञाननिष्ठ दृष्टीकोणघेऊन संघाचे तत्त्वज्ञान भक्कम करण्याचा डॉक्टरांनी प्रयत्न केला त्या आधारे संघाची वाटचाल चालू आहे. संघाच्या स्थापनेचा काळ हा हिंदु समाजातील रूढी, परंपरा व अंधश्रद्धांनी ग्रासलेला होता. एकीकडे स्व समाजातील सुधारणा आणि दुसरीकडे ब्रिटीश राजवटीमध्ये पारतंत्र्यातून बाहेर पडण्यासाठी असा दुहेरी संघर्ष करावा लागत होता. एक म्हणजे हिंदु समाजाचे दौर्बल्य आणि दुसरे ब्रिटिशांचे जूल्मी तंत्र असे दुहेरी संकट उभे होते. डॉ. हेडगेवार हे शाळेत शिक्षण घेत असतांना त्यांनी व्हीक्टोरिया राणीच्या 60 व्या वाढदिवसानिमित्त वाटण्यात आलेली मिठाई रागारागाने फेकून दिली होती. तसेच शाळेमध्ये संपूर्ण वंदे मातरम् म्हटल्यानंतर त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले होते. तसेच त्यांनी आपल्या मोठ्या भावांनी सांगितलेले पौरोहित्य करण्याचे काम त्यांनी साफ नाकारले. मि हे काम करणार नाही असे बाणेदार उत्तर दिले होते. स्वतः डॉ. हेडगेवार यांनी 1920 साली राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नागपूर अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला होता, परंतु तो मागे घ्यावा लागला. डॉ. हेडगेवार हे महात्मा गांधी यांचे निष्ठावान कार्यकर्ते होते. नाना पालकर यांनी हेडगेवार चरित्रात गांधी हेडगेवार संवादावर विशेष प्रकाश टाकला आहे. त्यातील चर्चेचा गोषवारा वाचनीय आहे. स्वातंत्र्यासाठी डॉ. हेडगेवार यांनी तीन वेळा तुरूंगवास भोगला होता. जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आणि सविनय कायदे भंगाची चळवळ यामध्ये त्यांचा सहभाग होता. त्याच्या मुक्ततेच्या वेळी मोतीलाल नेहरू हे विशेष उपस्थित होते, यावरून त्यांच्या कार्याची महती स्पष्ट होते. आपली संघटना नव्याने अंकुरली आहे. इंग्रज काही दगा फटका करतील व तिला रूजण्याआधी खुडण्यात येईल, हा धोका लक्षात घेऊन डॉ. हेडगेवार यांनी स्वयंसेवकांना स्वतःच्या पातळीवर स्वातंत्र्य लढ्यास भाग घेण्यास मोकळीक दिली. त्यांनी स्वतःही आंदोलनात उडी घेतली, पण संघटनेत मात्र त्यांनी मुक्त ठेवले होते. याचा अर्थ डॉ. हेडगेवार ब्रिटिशांच्या बाजूने होते असे म्हणता येणार नाही. त्यांनी कलकत्ता येथे 'अनुशीलन समिती'या क्रांतीकारक संघटनेत सहभाग नोंदविला होता. स्वामी विवेकानंद आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्याकडून घेतलेली प्रेरणा यामुळे त्यांचे अधिष्ठान पक्के होते. कलकत्ता येथे एम. बी. बी. एस. म्हणजे वैद्यकिय शिक्षण घेत असताना त्यांनी समाजाच्या व देशाच्या बिकट अवस्थेचे चित्र पाहिले होते. त्यांचे असे मत होते की, ''हा विराट हिंदु समाज निद्रिस्त झाला आहे. या समाज पुरुषातील चैतन्य शक्ती जागृत केल्याशिवाय हे राष्ट्र पुन्हा उभे राहणार नाही'' याचा अर्थ असा की या विराट हिंदु समाजात नवचैतन्य आणण्यासाठी निद्रिस्त पुरूषार्थाला जागृत करण्याचे त्यांनी आवाहन केले, त्यासाठी जातिभेदाच्या भिंती पाडून सर्व समग्र हिंदु समाजाला समरस आणि एक रस करावे लागेल, असे त्यांचे सूत्र होते. त्यांनी घालून दिलेल्या उद्दिष्ट आणि तत्त्वज्ञानावर आधारून संघाची गेल्या शंभर वर्षात भक्कम वाटचाल गतिमानपणे चालू आहे.

**संघावर तीन वेळा बंदी :** 1920 ते 31 या काळात त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढताना तीन वेळा तुरूंगवास भोगला. युवा अवस्थेत त्यांच्यावर लोकमान्य टिळक, विनायक दामोदर सावरकर, बी. एस. मुंजे यांच्या विचारांचा प्रभाव पडला. सावकरांनी लिहलेला हिंदुत्त्व हा ग्रंथ वालल्यानंतर डॉ. हेडगेवार यांचे वैचारिक परिवर्तन घडून आले. दीर्घकालिन विचार करता गांधी विचाराने देश बळकट राहणे अश्यक आहे हे पाहून त्यांनी "हिंदुत्त्व हेच राष्ट्रीयत्त्व" या सिद्धांचा पुरस्कार केला. होम रूल चळवळीच्या नेत्या ॲनि बेझंन्ट यांचेही असे मत होते की, हिंदुत्त्व भारताचा आत्मा आहे. हिंदुत्त्व उने केल्यास भारतामध्ये केवळ राख उरेल. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी आपल्या संघटनेचा कन्याकुमारीपासून कराचीपर्यंत आणि मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत विस्तार केला. प्रखर, ध्येयवादी आणि निष्ठावान कार्यकर्ते यामुळे कितीही संकटे आली तरी डॉ. हेडगेवार डगमगले नाहीत. डॉक्टरांच्या निधनापूर्वीच त्यांनी गोळवलकर गुरूजी यांची आपला वारस म्हणून निवड केली होती. 1947 मध्ये प्रथम संघावर चार दिवसांची बंदी घालण्यात आली. पुढे स्वातंत्र्यानंतर संघाने तीनदा बंदीला सामोरे जावून कमालीचा संघर्ष केला. 1948 साली महात्मा गांधीच्या हत्तेनंतर संघावरील बंदीच्या काळात मोठ्या अग्निदिव्यातून संघ बाहेर पडला. पुढे आणीबाणीच्या काळात 1975 ते 77 या काळात बाळासाहेब देवरस सर संघचालक असताना संघावर पुन्हा बंदी आली होती, त्यावेळी हजारो कार्यकर्ते तुरूंगात गेले व शेकडो भूमिगत झाले. जनता पक्षाच्या स्थापनेच्या वेळी लोकनायक जय प्रकाश नारायण म्हणाले होते की, संघाला देशद्रोही ठरवू नका संघास देशद्रोही म्हणाल तर मलाही ती टिका लागू पडेल. संघ ही निखळ देशभक्तांची संघटना आहे. या जयप्रकाश नारायण यांच्या विधानावरून संघाचे थोरपण सिद्ध होते. 1992 साली बाबरी मस्जिद पाडल्यानंतर संघाला तिसऱ्यांदा बंदीला सामोरे जावे लागले. परंतु "तप्त मुशितून जसे तावून सुलाखून सोने जसे बाहेर पडते, तसे प्रत्येक बंधीतून संघ सोन्या सारखा चमकत राहिला. डॉ. हेडगेवार यांचे राष्ट्र चिंतन, हिंदु-मुस्लिम प्रश्नांवरील त्यांचे मत, सामाजिक ऐक्याविषयी त्यांचे चिंतन हे इतिहाच्या प्रखर अकलनावर आधारलेले होते असे, सत्य चं.पं. भिशीकर यांनी लिहिलेल्या डॉक्टरांच्या चरित्रातून समोर येते. भारतीय स्वातंत्र लढ्यातील त्यांचा सहभाग लढ्याला नवी दिशा देणारा होता. देशापुढील ज्वलंत प्रश्नांबद्दल त्यांनी सुस्पष्ट मते मांडली. त्यांच्या तालमीत तयार झालेल्या डॉ. मा. स. गोळवलकर गुरूजी यांनी संघाचे समर्थ अध्यात्मिक नेतृत्त्व केले. त्यांच्या विचारधन (बंच ऑफ थॉट्स) या ग्रंथातून ठोस अध्यात्मिक बैठक स्पष्ट होती. श्री गुरूजीचें भाषणे व त्यांचे लेखन यातून हे त्यांचा प्रखर राष्ट्रवाद प्रकट होतो. विज्ञान, तंत्रज्ञानातील भावी प्रगती, भक्कम संरक्षण धोरण तसेच भारताचे परराष्ट्र धोरण कसे असावे याबाबत त्यांनी केलेले चिंतन आजही दिशा दर्शक ठरणारे आहे. प्रा. रामचंद्र गुहा यांनी लिहिलेल्या "इंडिया अफटर गांधी'' या ग्रंथामध्ये गुरू गोळवलकर यांच्या जिवन कार्यावर स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे तसेच नेहरू गुगामध्ये संघ-जनसंघाच्या नेत्यांनी राजकीय वर्तुळात किती सन्मान होता याचा आदर पूर्वक उल्लेख केला आहे.



**समरसतेचा सिद्धांत :** तिसरे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी सामाजिक समरसतेचा सिद्धांत मांडला आणि संघ कार्य अधिक लोकाभिमुख केले. ते खेडोपाडी बहुजन समाजापर्यंत पोहचविले आणि वनवासी आदिवासी लोकांपर्यंत संघकार्याचा विस्तार केला. याच काळात त्यांनी सामाजिक समरसतामंचाची स्थापना केली आणि समरसता साहित्य सम्मेलन या उपक्रमाचाही शुभारंभ केला. देवरस यांनी प्रयत्नपूर्वक संघाची प्रतिमा बदलली आणि संघाला समाजाच्यावरच्या थराऐवजी बहुजन समाजाची संघटना अशी बैठक प्राप्त करून दिली. याकाळात महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक सिद्धांचा स्विकार केला. त्यामुळे सामाजिक समरसतेचे इंद्रधनष अधिक बहुरंगी बनले आणि संघाच्याकार्याची बैठक नव्याने जनसामान्यांचा आशा आकांशा सफल करणारी संघटना, अशी ओळख देणारी ठरली. खेडे हा घटक मानून शहरे व खेड्यातील अंतर भरून काढताना समरसतेचे सूत्र सामाजिक न्यायाची हमी देणारे ठरले. याकाळात वेटबिगारपद्धतीचे निर्मुलन, वनवासी कल्याण, स्त्री-पुरुष समानता याकल्पनांचा विकास संघ कार्यात झपाट्याने होऊ लागला.

**संघातील पेरेस्त्रो एका :**

राष्ट्रीय स्वयंसेव संघाच्या रचना व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप चांगले बदल घडून आले आहेत. प्रा. राजेंद्र सिंह उर्फ रज्जू भय्या यांनी जगातील हिंदुनों एक व्हा, तुम्ही काहीही गमावणार नाहीत, तुमच्या पायातील साखळ्या गळून पडतील असा संदेश दिला. या काळात विश्व हिंदु परिषदेचे काम जोमाने पसरले व जगातही संघाच्या कार्याचा विस्तार झाला. पुढे के. सुदर्शन यांनी घरवापसी हा सुद्धा चळवळीचा नवा प्रयोग विकसित केला. मीनाक्षीपुरम येथील धर्मांतर रोखण्यात संघाला यश आले.त्यानंतर डॉ. मोहन भागवत यांनी संघामधील सुधारणा पर्वाला नवी गती दिली त्यांनी घर वापसीप्रमाणे संघातील रचना व कार्यपद्धतीत अमूलाग्र बदल घडून आणले. विशेषतः त्यांनी हिंदु समाजात अडसर निर्माण करणाऱ्या जाती प्रथेवर कठोर प्रहार केला. नव्या सुधारणांना उचलून धरले. हिंदु समाजात समग्र सुधारणेसाठी त्यांचे विचार चिंतनाला नवी दिशा देणारे ठरले त्यांच्या काळात त्यांनी संघाला एक नवी वैचारिक बैठक प्राप्त करून दिली. समाज व्यवस्थेत सुधारणा, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण शिक्षण, विज्ञान प्रसार असे विचार मांडून संघकार्याला त्यांनी नवी दिशा दिली संघाच्या रचनात्मक व सेवा कार्याविषयी देशाभरामध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली. आपत्ती प्रसंगी मदत व पूनर्वसन तसेच दुष्काळ, साथीचे रोग आणि देशावरील आक्रमण प्रसंगी संघाने बजावलेले कार्य नवी दिशा देणारे ठरले. भागवत यांच्या काळात त्यांनी संघाला नवी प्रगतीशील बैठक प्राप्त करून दिली त्यामुळे राष्ट्रीय राजधानीतील एका प्रतिष्ठित वृत्तपत्राने त्यांच्या सुधारणाचे वर्णन पेरेस्त्रो एका या समर्पक शब्दामध्ये केले. त्यांच्या काळात संघाने अल्पसंख्याक मुस्लिमांची नवी मोहिम आखली. दिल्लीतील जामा मस्जित त्यांनी भेट दिली तेव्हा त्यांचा उल्लेख तेथील गुरूंनी राष्ट्रपिता (फादर ऑफ नेशन) असा केला. भागवत यांनी संघाच्या वार्षिक दसरा उत्सवात केलेली भाषणे त्यांच्या दूर दृष्टीची साक्ष देतात. गेल्या दशकांमध्ये विविध प्रसंगी त्यांनी मांडलेल्या राष्ट्र चिंतनात शेती विज्ञान शिक्षण तसेच सामाजिक सुरक्षा आरोग्य कुटुंब प्रबोधन स्त्रि शक्ती जागरण आरोग्य संवर्धन इत्यादी क्षेत्रात त्यांनी मांडलेले विचार आधुनिक क्षेत्रात भारताला नवी दिशा देणारे ठरले आहेत. संघाच्या प्रतिनिधी सभेतील ठराव हे आता ग्रंथ रूपाने प्रकाशित होत आहेत. त्यांचा अभ्यास केला असता भागवत यांच्या दुरदृष्टिचा प्रत्येय येतो.

**समारोप :** संघाची रचना व कार्यपद्धती अत्यंत सुलभ व सुबोध आहे. नित्य शाखा हा सर्व प्रश्नावरील उपाय आहे. स्वयंमसेवक व कार्यकर्त्यांची जडण घडण ही नित्य उपक्रम, उत्सव व संस्कारातून होते अशी संघाची धारणा आहे. वर्षभरातील उत्सव तसेच उपक्रम यातून समाजाशी नाते जोडले जाते आणि शांखाच्या माध्यमातून नित्य समरसत्या घडून येते. विविध प्रकारचे उपक्रम हे समाज सेवा व सुधारणांना गती देणारे ठरतात. संघाच्या सलग्न अशा 26 पेक्षा अधिक संघटना आहेत. त्यामध्ये भाजप प्रमाणेच शिक्षण संघ भारतीय मजदूर संघ, किसान संघ, सेवा भारती, विज्ञान भारतीराष्ट्र सेविका समिती, अभाविप, शिक्षा भारती, विश्व हिंदु परिषद, युवा सेवा संघ स्वदेशी जागरण मंच, विद्या भारती, संस्कार, भारती, सहकार भारती, प्रज्ञा भारती इत्यादी संघटनांचा समावेश होतो. अलिकडेमुस्लीम तरूणामध्ये जागृती घडविण्यासाठी मुस्लिम राष्ट्रीय मंचही संघना जिवाचे रान करत आहे. आदिवासी भागात काम करणाऱ्या वनवाशी कल्याण आश्रमात उत्तर पूर्व भारतामध्ये चांगला प्रतिसाद लाभत आहे. भारतीय इतिहास संकलन समितीने देशभरातील अज्ञात ऐतिहासिक संदर्भ नव्याने उजेडात आणले आहेत व साम्यवादी इतिहासाचा गड असलेल्या अडिगड स्कूलला जब्बर आव्हान दिले आहे. अशा प्रकारे संघाचे कार्य विविध क्षेत्रात देशभर पसरले आहे शताब्दी वर्षामध्ये संघाच्या कार्यात अलौकिक प्रतिसाद लाभत आहेत. राष्ट्राच्या उभारणीमध्ये युवकांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी संघ तरूणांच्या संघटनावर भर देत आहे. संघ शाखांची केवळ संख्यात्मक वाढ नव्हे तर गुणात्मक विकासावर भर दिला जात आहे. भारतामधील प्रत्येक खेड्यामध्ये संघ शाखा पसरावी असे प्रयत्न होत आहेत. तसेच राष्ट्र जिवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये संघ कार्याचा विस्तार केला जात आहे. या अगामी शताब्दी वर्षामध्ये राष्ट्रीय स्वयंमसेवक संघ ही संघटना देशाचे हृदय स्थान बनत आहे. "एक हृदय हो भारत जननी" या काव्य वचनाप्रमाणे भविष्य काळात संघ लोकापर्यंत पोहचत आहे. आणि शताब्दी वर्षात एखाद्या वटवृक्षाप्रमाणे संघ परिवाराचा विस्तार होत आहे. स्वातंत्र्याच्या अमृत मोहत्सवी वर्षात समरसतेची मधुर फळे सर्वांना चाखायला मिळत आहेत. या विराट हिंदु समाजात नवचैतन्य आणण्याचे डॉ. हेडगेवार यांचे स्वप्न शताब्दी वर्षात साकार होत आहे यात तीळ मात्र शंका नाही. शोषण मुक्त कृषी औद्योगिक समाजाची जडण घडण करणे आणि भारताला बलशाली राष्ट्र बनविणे हे संघाचे ध्येय असून भविष्य काळात त्या दिशेने वाटचाल चालू आहे. पुढील लेखात डॉ. हेडगेवार यांची दिव्य दृष्टी मांडली आहे.

# श्रीमती अर्चना बढे -नवरे : नर्सिंग क्षेत्रातील कणखर व्यक्तिमत्त्व



डॉ. दीपाली उमाळे
मुंबई. मो. ९९६९७३९८३३

आधुनिक केसरी

**नर्सेसचे सर्वोच्च पद असलेल्या राज्य नर्सिंग अधिक्षीका पद (SNS) असो वा राज्यातील तमाम नर्सेसची शिखर संस्था समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या प्रबंधक म्हणून आपलें कर्तृत्व गजवणाऱ्या असो वा सेंट जोर्जेस रुग्णालयातील परिचर्या विभागाच्या अधिक्षिका असोत या तिन्ही उच्च पद भूषवणाऱ्या कोणी तिन्ही वेगवेगळ्या व्यक्ती नसून तिन्ही पदांना न्याय देणाऱ्या आपली निर्णयक्षमता , चिकाटी, जिद्द, योग्य व्यवस्थापन सिद्ध करणाऱ्या कणखर नेतृत्व म्हणजे श्रीमती अर्चना बढे नवरे मॅडम.**

हे सर्व एवढ्या कमी वयात कस शक्य झालं? असच आपल्याला वाटत ना पण त्यांची प्रत्यक्ष भेट घेतल्यावरच आपल्याला उमगत की हा डोलारा सांभाळने एका व्यक्तीला कस शक्य आहे.! बढे मॅडम आपल्या खडतर अविरत प्रवासाबद्दल सांगतात महाराष्ट्रातील विदर्भातील दुर्गम भागात असलेल्या वाशीम जिल्ह्यात एका लहान गावातून सुरु झालेला हा प्रवास राज्याच्या राजधानी पर्यंत कसा येऊन पोहोचला ते. श्रीमती अर्चना बढे यांना रुग्णसेवेचे बाळकडू आपल्या आईकडूनच मिळाले असे त्यां आवर्जून सांगतात . वडील परराज्यात पोलीस खात्यात कार्यरत तर आई आरोग्य सेविका म्हणून खेडे गावात कार्यरत होत्या. त्यामुळे दोन्हीनी पालक अत्यावश्यक सेवेत असल्यानें त्याचे गांभीर्य, वक्तशीरपणा, व कामाची पद्धत त्यां लहान वयातच जाणून होत्या. मॅडम बढे यांनी आपल्या आईचे कामं जवळून बघितले आहे.आपली आई आरोग्य सेविका म्हणून गावात प्रत्येक घरोघरी जाऊन महिलांच्या आरोग्याची घेत असलेली काळजी पाहता, नकळत त्यांच्या मनात रुग्णसेवेची इच्छा निर्माण झाली आणि आपल्या आईने घेतलेले रुग्णासेवेचे व्रत पुढे चालू ठेवण्यासाठी मनोमन केलेला निश्चय, या जोरावरच शिक्षणात हुशार असल्याने आईसारखे काम करायचे म्हणून गावातून बाहेर पडत मॅडमनी तालुक्यात बारावी पर्यंत उद्भवलेल्या परिस्थितीशी सामना करीत आपलें शिक्षण पूर्ण केले. बढे मॅडम त्यांच्या निश्चया बद्दल सांगताना बोलतात की, त्यांच्या मनात पक्क बिंबवल होत की रुग्णसेवा करायची म्हणजे आपल्याला नर्सिंग क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणारच. आज प्रत्येक तालुक्यात नर्सिंग विद्यालय आहे. परंतु आजपासून 30 वर्षांपूर्वी मोठ्या शहरांतच नर्सिंग विद्यालय असायचे ही सत्य स्थिती होती. बढे मॅडम या आई च्या मार्गदर्शनात जी एन एम हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी गावापासून तब्बल 400 किलोमीटर चा प्रवास करून त्यांनी नागपूर गाठले. नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे सदर अभ्यासक्रमास ऍडमिशन घेतले व ते यशस्वी रित्या पूर्ण देखील केले. त्याकाळी घरापासून 400 किमी अंतर दूर, त्यात आजसारखी संपर्क माध्यम म्हणजे दुरध्वनीची सुविधाही नसल्याने कित्तेक दिवस आई वडिलांशी संवाद तर जणू नसल्या सारखाच होता . पण तरीही न डगमगता निर्माण झालेल्या परिस्थितीशी दोन हात करीत मनातील निश्चय डोळ्यासमोर ठेवून ध्येय गाठण्याची जिद्द मनी असल्याने आपले स्वप्न यशस्वी रित्या पार पाडले. पण या दरम्यान मिळालेले प्रशिक्षण आणि शिस्त हे अनोखेच म्हणजे आत्मविश्वास वाढवणारे ठरले असल्याची भावना मॅडम बढे सांगतात. प्रशिक्षण काळात सोबत असलेली विभा आदमाने ही एक चांगली मैत्रीण मिळाली असल्याचे त्या सांगतात. नर्सिंग क्षेत्रात बीएसस्सी नर्सिंग हा पदवी अभ्यासक्रम तू करायचा. हे विभाने त्यांच्या मनात निर्माण केलेले पदवीचे स्वप्न. आयुष्यात यशाच्या पायऱ्या चढतांना घरच्यांसह आपल्या संगती असलेल्या मैत्रिणींचाही तेवढाच हातभार असतो ज्यामुळे आपण जीवनात पुढे सरकत जातो असंही कृतज्ञ भाव जाणीव आजही त्यांच्या मनात आहे. डिप्लोमा पूर्ण करताच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या गो.ते. रुग्णालयात परिचारिका म्हणजेच नर्स म्हणून त्यांनी नोकरी प्राप्त केली. आधी गावातून तालुक्यात आणि तेथून थेट राज्याची उप राजधानी आणि नोकरीसाठी मुंबई हा प्रवास म्हणजे एक जणू सर्कस होती. नर्स म्हणून काम करतांना टीएनएआय च्या माध्यमातून राज्यात चर्चासत्रात भाग घेत. त्यात अनेकदा पुरस्कारही मिळाले. त्यामुळे अनेक वेळा अशा चर्चा सत्रात आणि कार्यशाळेत सहभाग नोंदवतांना रुग्णसेवेसाठी स्पुर्ती मिळाली. रुग्णसेवा हे बाळकडू घरात आईकडूनच मिळाल्याने प्रत्यक्षात रुग्णसेवा करतांना कधीही कर्तव्यपासून दूर गेल्या नाही. कर्तव्य आणि रुग्णसेवेविषयी मनोभाव याची सांगड घालीत रुग्णसेवा परमोधर्म हेच ब्रीद मनात कोरले होते. त्यांची जिद्द आणि शिकण्याची चिकाटी होती. आणि त्यांनंतर पुन्हा सुरु झाला पदवी प्रवास. या दरम्यान अचानक त्यांच्या वडिलांचे छत्र हरपले. या घटनेने त्या पूर्णपणे खचून गेल्या होत्या. पण मनात जिद्द होती. आईचा प्रवास डोळ्यासमोर उभा राहत असल्याने शिकायचं आहे. पुढे जायचं आहे. असे मनोमन ठरवून स्वतःला सावरत गेल्या. त्यांनंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा निश्चय केला. आणि पहिल्याच प्रयत्नात अधिसेविका या वरिष्ठ पदावर विराजमान झाल्या. 2008 ला झालेल्या आतंकवादी हल्ला हा अगदी जवळून अनुभवला,हल्ल्याच्या वेळी मुलगी फक्त चार महिन्यांची लहान असतानाही त्या कर्तव्याचे जाणीव ठेवून आपली बालसंगोपन रजा असून त्याच दिवशी कर्तव्यावर रुजू झाल्या. आधी एक नर्स म्हणून रुग्णसेवा आणि आता त्याच नर्स चे आपण वरिष्ठ झालो याची जाणीव मनात ठेवून त्यांनी नर्सेसला उद्भवणाऱ्या समस्या सोडवत रुग्णसेवेसाठी मजबूत करणे याचे ध्येय निश्चित केले. स्वतः नर्स म्हणून काम केल्यामुळे नर्सेस ला येणाऱ्या अडचणी याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे त्यांची वरिष्ठ म्हणून त्यांच्या प्रत्येक अडचणी सोडविण्याचे आपलें आद्य कर्तव्यच ही भावना खोलवर रुजलेली. तरच त्यांच्या माध्यमातून रुग्णसेवा देता येणार याची जाणीव होतीच. त्यामुळे आता पालकांच्या भूमिकेत शिरल्यानंतर पुढचे आव्हाण हे सोपे नव्हते. कारण त्याच रुग्णालयात त्यांनी नर्स म्हणून 12 वर्ष काम केले होते.या सर्व आव्हानांना पेलताना त्यांना पतीची भरभक्कम साथ मिळाली. त्यामुळे नर्सिंग क्षेत्रातील पदविका हा अभ्यासक्रम म्हणजेच एमएसस्सी पूर्ण करता आला.2014 ला हिमालय पुल कोसळून 3 परिचारिका मृत पावल्या



कर्तृत्वान नवदुर्गा
भाग : पाच

तेव्हा व्यवस्थापना सोबतच परिचारिकांच्या नातेवाईकांनाही धीर देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. या सर्व काळात सर्वासामान्य माणसांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्यांची जाणीव होती. परंतु सर्वाधिक कठीन आणि अवघड परिस्थिती म्हणजे कोविड या अतिशय भयानक अशा साथीच्या रोगाची. या काळात तर रात्रंदिवस नर्सेसच्या सोबतीला रुग्णालयात खांद्याला खांदा लावून रूग्णांना होईल ती मदत करण्यासाठी कायम कार्यतत्पर राहिल्या. कोविड हा आजार म्हणजे यापासून सुरुवातीला आरोग्य क्षेत्रही अभिज्ञनच. रुग्णसेवा कुठेही कमी पडणार नाही याचे व्यवस्थित नियोजन करून मॅडमनी रुग्ण तसेच परिचारिका त्यांच्या आरोग्याची ही भरपूर काळजी घेतली. कारण त्या बाधित झाल्या तर रुग्णसेवा कोलमडून जाईल याची मनोमन भीती त्यांना होती.

त्यांनंतर शासनाने राज्यातील तमाम नर्सेसच्या नेतृत्वाची, हक्काची आणि मायबाप असलेल्या महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल च्या निबंधक पदाचा अतिरिक्त पदभार त्यांना देण्यात आला. अधिसेविका म्हणून कार्यरत असतांना कौन्सिल च्या निबंधक पदाचा कार्यभार म्हणजे निराळाचं. कारण इथे रुग्णसेवा नव्हे तर रुग्णसेवा देण्यासाठी प्रशिक्षित नर्सेसची नोंदणी करून रुग्णसेवेसाठी त्यांना अधिकृत ठरवणे हे कर्तव्यही करण्याची संधी त्यांना मिळाली. रुग्णालयीन कामकाज याची जाणीव होती पण कौन्सिल च्या कामाबाबत नवखेच असतांनाही नियमानुसार कामाची रुपरेषा आणि कठोर प्रशासकीय क्षमताही यावेळी त्यांनी सिद्ध केली. त्यामुळे नर्सेसच्या अडचणी आणि नर्सिंग महाविद्यालय व विद्यालयाच्या समस्या सोडविण्याची संधी मिळाल्याने रुग्णालय आणि कौन्सिल या दोन्ही ठिकाणी कर्तव्य निभावत असतांना घराची जबाबदारी त्याच क्षमतेचे सांभाळली. दोन्ही पदाचा पदभार असल्याने संध्याकाळी अनेकदा कामकाज करतांना घरी यायलाही उशीर होत. त्यामुळे त्यांना प्रशासकीय आणि रुग्णालयीन कामाची धुरा यशस्वी सांभाळता आली. काही दिवसांनी त्यात आणखी भर पडली ती वैद्यकीय शिक्षण विभागातील रिक्त झालेल्या नर्सिंग अधीक्षक पदाचा पदभार मिळाल्याने. सदर पद म्हणजे राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कार्यरत असलेल्या नर्सेसच्या पालकत्वाची. शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेत असताना नर्सिंग अधीक्षक म्हणून महत्वाची जबाबदारी पार पाडली जाते. कारण प्रशासकीय कामकाजत नर्सिंग क्षेत्रातील नियम व तरतुदी यांची सांगड घालून नर्सेस ला न्याय मिळवून देणे तसेच नर्सिंग विद्यालयातील समस्या,त्याबाबत धोरण,रुग्णालयीन कामकाज आणि नर्सेसच्या समस्या सोडवतांना नव्याने या क्षेत्रासाठी निर्माण होणारी धोरण आणि त्याची अमलबजावणी करून घेणे, अशी मोठी जबाबदारीच त्या पार पाडत आहे. सध्या राज्य नर्सिंग अधीक्षका, कौन्सिल निबंधक आणि अधिसेविका या तिन्ही पदाचा पदभार सांभाळून घराची जबाबदारी पार पाडत असतांना आपली कार्यक्षमता कुठेही डगमगळू देत नाही. तरीही तिन्ही पदाची जबाबदारी सांभाळतांना निर्णयक्षमता, कठोरता आणि वेळेचे नियोजन याची सांगड घालून तिन्ही पदाला न्याय दिला जात आहे. त्यामुळेच एक महिला अधिकारी त्यात तीन पदाचा पदभार सांभाळतांना नियमाला धरून कठोर निर्णय, तत्परता आणि सहजकता यामुळेच जवळपास 17 हजार पेक्षा अधिक नर्सेसचे नेतृत्व करण्यासाठी त्यांच्या खांद्यावरील धुरा सांभाळत कार्यक्षम अधिकारी म्हणून स्वतःची ओळख निर्माण करून आपली कार्यक्षमता सिद्ध करीत आहे.

नवरात्र उत्सवानिमित्ताने अशा व्यक्तिमत्वास आणि त्यांच्या कार्यास आधुनिक केसरीचा सलाम..!

# डॉ. राणी शेट्टी : पडद्यामागे राहून विद्यार्थ्यांना पुढे नेणाऱ्या शिक्षिका

आधुनिक केसरी

**हाताच्या बोटावर मोजणारे असे परिचर्या व्यवसायातील महाराष्ट्रातील तुरळक व्यक्ती असतील की ज्यांना डॉ. राणी शेट्टी हे नाव माहित नाही, कुठल्या ना कुठल्या माध्यमातून त्यांची नाळ प्रत्येकाशी जोडली गेली आहे. त्यांचं वैशिष्ट म्हणजे एक हाडाची शिक्षिका, शिकवताना विद्यार्थ्यांसमोर साक्षात एखाद्या रोगाचं व त्या रोग्याचं चित्र निर्माण करणारी कुठलही पुस्तकं हातात न घेता आपलं आघात ज्ञान व त्याला स्वअनुभवाची जोड देऊन विद्यार्थ्यार्जन करणारी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी झपाटलेली, त्यांनाच आपलं सर्वस्व मानणारी डॉ. राणी शेट्टी या होय.**

ज्यांची दुसरी ओळख म्हणजे मुंबईची प्रतिष्ठित SNDT वूमन युनिव्हर्सिटी आणी तेथील एलटी (लीलाबाई ठाकरसी)कॉलेज ऑफ नर्सिंग. हे विद्यालय म्हणजे परिचारिका विद्यार्थिनींची जशी दुसरी पंढरीच. येथे शिक्षण मिळावं हे मनी स्वप्न सहस्त्र परिचारिका बघून असतात. येथूनच शिकून आज परिचर्या व्यवसायातील विद्यार्थिनी वेगवेगळ्या देशांमध्ये मोठमोठ्या पोस्टवर कार्यरत आहेत. डॉ. राणी शेट्टी या मात्र येथेच कार्यरत राहून सर्वांना सन्मार्ग दाखवण्याचे अविरत काम करत राहिल्या म्हणूनच त्यांना वटवृक्षाची उपमा देणे वावग ठरणार नाही समर्थ, स्वावलंबी, सदा बहरलेलं . स्वतः खंबीर पणे उभे राहून आपल्या छत्रछायेखाली येणाऱ्या प्रत्येकाची शिक्षणाची भूक पुरवून पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणारे आपल्या असंख्य शाखा पसरवून त्यांना आपलं अस्तित्व देणे हे खूप वंदनीय कामं आहे. त्यांची शिकवण्याची पद्धतही फार निराळी कुणालाही कमी न लेखता सर्व विद्यार्थ्यांना समान लेखन , तळागाळातून देशाविदेशातून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना परिपूर्ण बनवण, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण, शिस्त, सत्य याचा पायंडा पडण, रुग्णाप्रति आस्था, रुग्णसेवा सर्वोधर्मा अशी बीज विद्यार्थांच्या मनात रुजवन असे शिक्षक मिळन म्हणजे परम भाग्य. आणि इथे नमूद करताना मला फार आनंद होतो की हे भाग्य मला लाभले. मला त्यांची विद्यार्थिनी असल्याचा खूप सार्थ अभिमान आहे आणी त्यासाठी मी या परमेश्वराची अत्यंत ऋणी आहे. डॉ. राणी शेट्टी हे प्रलब्ध व्यक्तिमत्व कस तयार झालं? त्यांच्या शब्दात त्यांचा प्रवास आपण जाणून घेऊयात . डॉ शेट्टी यांचा प्रवास एल टी कॉलेज ऑफ नर्सिंग येथूनच सुरू झाला त्यांनी BSC नर्सिंग सन 1995 मध्ये तसेच MSC नर्सिंग सन 2000 मध्ये, आणि डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी PHD पूर्ण केले या सुनिवर्सिटीमधूनच 2013 मध्ये . त्या स्वतः जसं जसं घडत गेल्या तसंच आपल्या इन्स्टिट्यूटला, येथील दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील त्या घडवत गेल्या. हा प्रवास त्यांच्यासाठी अजिबात सुखकर नव्हता बरेच कष्ट करून मेहनतीने, जिद्दीने, त्यांनी हे शिक्षण क्षेत्रातील आपल्या विद्यार्थिनींच्या मनामनावर सर्वोच्च स्थान मिळविले. डॉ. शेट्टी सांगतात बीएससीनंतर



कर्तृत्त्वान नवदुर्गा
भाग : सहा

त्यांनी आयसीयू मध्ये कामाच्या स्वरूपाचा अनुभव व त्यात प्राविण्य नानावटी हॉस्पिटल तसेच भाटिया हॉस्पिटल येथे मिळविले. आता विदेशातील कामाचा अनुभव घेण्यासाठी त्या सौदी अरेबिया येथे पोहोचल्या आणि किंग फहद युनिव्हर्सिटी हॉस्पिटल, अल-खोबर, सौदी अरेबिया मध्ये थोडी थोडकी नवे तर चक्क आठ वर्षे काम केले.कुटुंब, मुलं या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आपल्या कामावर निस्सीम प्रेम असल्या कारणाने अतिदक्षता विभागातील त्यांचा कामाचा अनुभव एवढा दांडगा झाला त्यांच्या अनुभवाची भर पडत गेली आणि त्या एक प्रकारे क्लिनिकल तज्ज्ञ म्हणून आकार घेत गेल्या.


डॉक्टर शेट्टी आपल्या ज्ञानासाठ्या मागचे गमक सांगतात ज्या प्रत्येक रुग्णाची काळजी त्या घेत होत्या त्यांच्यासाठी तो ज्ञानाचा स्रोत बनला आणि तो खऱ्या आयुष्यातील अनुभव म्हणजेच त्यांचा जीवन अनुभव त्यांच्या शिकवण्यात त्यां उपयोग करूशकल्या. तदनंतर भारतामध्ये आल्यावर त्यांनी एल टी कॉलेज ऑफ नर्सिंग येथून आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले एमएससी नर्सिंगनंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात शिक्षिका म्हणून एलटी कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये प्रवेश केला व आपले ज्ञान दानाचे कामं करतच त्यां याच कॉलेज मधून 2017 मध्ये त्यांच्या सेवेतून निवृत्त झाल्या. त्यांना त्यांच्या युनिव्हर्सिटीचा व कॉलेजचा अर्थातच खूपच अभिमान आहे. त्यां स्वतःला खूप भाग्यवान समजतात की त्यां एक विद्यार्थी म्हणून कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी उत्सवाचा आणि प्राध्यापक म्हणून सुवर्ण आणि हीरक महोत्सवी उत्सवाचा भाग होत्या, याचा त्यांना खूप आनंद होतो. कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात माजी विद्यार्थी संघटना "तारांगण" च्या शुभारंभाचा एक भाग असल्याचा त्यांना अभिमान आहे ज्यामुळे या युनिव्हर्सिटीतून बाहेर पडलेले सर्व विद्यार्थिनी एका छत्राखाली एकत्र येऊ शकतात. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी कॉलेजमध्ये वेगवेगळी चर्चासत्रे, नवनवीन विषयांवर कार्यशाळा आयोजित करणे, कॉन्फरन्स आणि सेमिनारमध्ये भाग घेणे, पेपर्स सादर करणे आणि इतर युनिव्हर्सिटी अथवा कार्यक्रमांमध्ये व्याख्याने देणे हे चालूच राहिले. नियमित अभ्यासक्रमातून तारांगणच्या बॅनरखाली सचिव म्हणून, एमएससी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसह इतर हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षण उपक्रम राबवण्याचे त्यांना भाग्य लाभले असे त्यां मोठ्या अदबीने सांगतात. आपण समाजाचा एक अत्यावश्यक अंग असल्यामुळे सामुदायिक विस्तार उपक्रमांना देखील त्याकाळच्या शिक्षण पद्धतीमध्ये समान महत्व देण्यात आले. डॉ. शेट्टी खूप आनंदी आहेत की एलटी कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये प्राध्यापक म्हणून, त्यांना पदवीपूर्व आणि पदव्युत्तर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे भाग्य लाभले. त्या मोठ्या गर्वाने सांगतात त्यांनी शिकवलेले अनेक विद्यार्थी भारत आणि परदेशात यशस्वी नर्सिंग संचालक, प्राचार्य, नर्स प्रॅक्टिशनर्स, नर्स ऍनेस्थेटिस्ट इत्यादी बनले आहेत. वेगवेगळे एक्सटेंडेड व एक्सपांडेड रोल ते करत आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात एवढं ओत प्रोत प्रेम भरलं आहे की त्यांच्या शिकण्यात आणि यशातही त्यांच्या हरहुन्नरी विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे अस त्यां आवर्जून म्हणतात. संशोधनातील त्यांच्या आवडीमुळे त्यांना सत्तर पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना त्यांच्या एमएससी प्रबंधात मार्गदर्शन करण्यात मदत केली तसेच बऱ्याच विद्यार्थ्यांचे पीएचडी प्रबंध पूर्ण करण्यासाठी त्यांचे निरीक्षण केले. त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्यातील हाडाचा शिक्षक त्यांना शांत बसून देत नव्हता आणि म्हणूनच इमर्जंट मेड-टेक सोबत 2019 मध्ये सिम्युलेशन ट्रेनिंग देत आपल्या ज्ञानार्जनाचं काम चालूच ठेवलं, त्यांच्याकडे पूर्ण परिचर्या विद्यार्थिनी संवर्ग GNM, BSC, PBBSC, आणि MSC, नर्सिंगमध्ये सुमारे 410 विद्यार्थी आहेत आणि त्यां या तरुणांच्या मनात नर्सिंगची त्यांची आस्था त्यांची आवड निर्माण करत आहेत. येथे गाईड म्हणून विद्यार्थ्यांचे पीएचडी पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे आणि सध्या पुढील आठ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहे. डॉक्टर शेट्टी सध्याच्या शिक्षण व्यवस्थेबद्दल नाराजीने बोलतात त्यांची, आज भारतातील नर्सिंग शिक्षणाबाबत त्यांची सर्वात मोठी चिंता अशी आहे की, ज्या महाविद्यालयांतून दूरस्त पद्धतीने GNM, PPBSC, आणि MSC नर्सिंग कार्यक्रम राबवत आहेत. विद्यार्थी क्लिनिकल भागात जात नाहीत अनुभव घेत नाहीत अशा महाविद्यालयांमधून पदवीधर झालेले विद्यार्थी पुढे रुग्णांसाठी कसं काम करणार. वयाच्या साठी नंतरही त्यांचा प्रवास अजूनही सुरूच आहे, त्यां सध्या त्यांचे अधुरे राहिलेले संशोधन प्रकाशन आणि पुस्तक लेखनाकडे लक्ष केंद्रित केले आहे, अशा या कणखर, स्पष्ट वक्त्या, विद्यार्थ्यांसाठी चुकीच्या बाबतीत तडजोड न करणाऱ्या, आपल्या तत्त्वांना मुरड न घालणाऱ्या, उत्कट, आणि विद्यार्थ्यांसाठी समर्पित शिक्षिका. परिचारिका आणी परिचर्या नवरात्र उत्सवानिमित्ताने अशा व्यक्तिमत्वास त्यांच्या कार्यास आधुनिक केसरीचा सलाम..!

# दसरा जयाद्रीचा खेळ मर्दानी तलवारीचा, पहा इतिहासाच्या झरोक्यातून

आधुनिक केसरी

**भारतातील लोकप्रिय उत्सव म्हणून विजयादशमी मोठ्या प्रमाणावार साजरी होत असते बहुरंगी आणि बहुढंगी महाराष्ट्रचे लोकदर्शन घडवणाऱ्या या सणाचे उत्सवाचे अनेक लोकरंग परंपरा संस्कृतीच्या सांस्कृतिक चेहऱ्याचे विशाल दर्शन घडवीत असतात असाच एक जयाद्रीच्या डोंगर माथ्यावर चित्तथरारक लक्षवेधी दसरा म्हणजे जेजुरी खंडोबा देवाचा सामाजिक ऐक्याची साक्ष देणारा मर्दानी दसरा यातील विजयादशमीचा मानकरी ठरलेला खंडोबा देवाचा महाखंडा अर्थात खडगधारी खंडोबा मार्तंड देवाचा 42किलो वजनाची तलवार या पारंपरिक चित्तथरारक महा तलवारीचे वैशिष्ट जाणून घेऊ इतिहासाच्या झरोक्यातून.**

ध्वज वादय आणि खंडा आशा शस्त्रना विजयदशमी या उत्सवात अन्यनसाधारण महत्व असते. जेजुरी म्हंटले की डोळ्या समोर उभी राहाते ती घोड्यावरची युद्ध स्वरूपातील प्रतिमा आणि पिवळ्या जर्द हळदीने सजलेली सोन्याची जेजुरी हरिद्रचूर्ण अर्थात हळद भंडारा हे भंडारा लेणे साक्षात शिवमहादेव अवतारीत मल्हारी मार्तंडाला प्रिय असल्याने येळकोट नामाची गर्जाना करीत भंडारा उधळन्याची प्रथा ऐतिहासिक राजरजवाडे शुर वीर सरदार महाराजांच्या काळा पासूनची दिसून येत खंडोबा मार्तंड भैरव हे लोकदैवत अठरा पगड जाती धर्माचे बहुजन सामाजिक ऐक्याचे आराध्य दैवत मानले जाते नवसाला पावणारी देवता म्हणून आजही देवाचा लौकिक मानला जातो म्हणूच सुमारे चारशे वर्षांपूर्वीच्या मराठा मुघलं युद्ध काळातील सरदार महीपतरावं पानसे आणि धनगर साम्राज्यातील एका सरदाराने युद्धात यश प्राप्ती करिता खंडोबा देवाला नवस बोलला त्या युद्धतील अभूतपूर्व यशपूर्तीचे श्रेय देवाला देत सुमारे बेचाळीस किलो म्हणजे एक मणांचा विशाल असा शस्त्र स्वरूपी खंडा विजयदशमी दिनी कुलदैवताला अर्पित केला तोच आजचा विजयादशमीचा मानकरी महाखंडा आजही बहुजन ऐक्याची साक्ष देणाऱ्या जेजुरीकरानी जतन केला आहें विजयादशमी म्हणजे जेजुरी मानकरी खान्देकरी गावकरी गुरव पुजारी सेवेकरी कोंळी घडशी वीर दांगट यांची आनंद पर्वनी म्हणावी लागेल दूरदेशात नोकरीं उद्योग व्यवसाय



करिता गेलेला ग्रामस्थ, प्रवाशी भाविक देखील दसऱ्याला आणि चित्तथरारक खेळ पाहायला आवर्जून येत असतात पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेला गावकरी कपाळी हळद लावून बलाढ्य आशा देवाच्या सजविलेल्या पालखीला अभिमानाने खांदा देत मंदिरातील ऐतिहासिक धार्मिक सांस्कृतिक परंपरा पाळतो चोवीस तासातील या रंगतदार दसऱ्यातील अठरा ते वीस तास देवभेटीचा सोहळा रंगला जातो यातील खास आकर्षण म्हणजे तलवार स्पर्धा विजयदशमीत शस्त्र पूजन महत्वाचे मानले जाते रामायण महाभारत ते महाराष्ट्राचे छत्रपती राजे शिवाजी महाराज भोसले यांच्या काळातही शस्त्र पूजन केले जाते याचे पौराणिक मूळ म्हणजे कृत युगातील खंडोबा देवाच्या युद्ध नितीचा विजय मानला जातो आजही जेजुरीचा खंडोबा भक्त युवा सुदृढ दीर्घ आयुष्याची मागणी करीत ही तलावर मोठ्या शोर्याने उचलतो एक हाताने तलवार तोलून धरून मोठ्या जिकरीने सुमारे वीस ते चोवीस मिनिटाचे रेकॉर्ड विजेता आज पर्यंत नोंदविला गेला आहें त्यापेक्षाही चित्तवेदक थरारक दाताने तलवार उचलून तोलून धरणे सारखे अनेक लक्षवेधक कसरती सादरीकरण केल्या जात असतात धर्म अर्थ शास्त्र आणि पारंपरिक शस्त्राने नटलेल्या लोकसंस्कृतीचा भक्ती कल्लोळ म्हणजे जेजुरीचा मर्दानी दसरा खंडेराया, खडगधारी, खंडोबा असे विविध शस्त्र नामी नावाने ओळखले जाते.

विजयकुमार हरिश्चंद्रे

# श्री रामाचे विशेष कार्यस्थळ : दंडकारण्य-छत्तीसगड



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**वास्तविक, राम, रामकथा, रामायण, रामचरित मानस या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा प्रचार केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगात सांस्कृतिक भाषांसह विशेषत: इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, लाओस, जावा, सुमात्रा, बाली, मॉरिशस, श्रीलंका, व्हिएतनाम., म्यानमार, तिबेट आणि मध्य आशियाई देश तसेच इतर अनेक देशांमध्ये विस्तारलेला आहे. रामायण काळातील दंडकारण्य आणि त्यात वसलेले आजचे छत्तीसगड हे रामाच्या वनवासाच्या काळात मुख्य कार्यस्थळ होते.रामायण काळात छत्तीसगडची वनभूमी जनस्थान, दंडकारण्य या नावाने प्रसिद्ध होती.**

दंडकारण्य विंध्याचलच्या दक्षिणेपासून गोदावरीच्या पंचवटीपर्यंत विस्तारलेले होते. महाभारत काळात याला महाकांतर, महारण्यक आणि ऐतिहासिक कालखंडात दक्षिणपथ असे म्हणतात. रतनपूर (छत्तीसगड) मार्गे काशी ते जगन्नाथपुरी आणि तिथून रामेश्वरम असा हा मुख्य आरण्यक मार्ग होता. वाल्मिकी रामायणानुसार, ते 'आरण्गैश्च महावृक्षेः पुण्येः स्वादुफलेववत्ताम" एक असे जंगल होते ज्यामध्ये खूप सारी स्वादिष्ट फळे होती. फळांच्या उपलब्धतेमुळे या जंगलात आहाराच्या चिंतेपासून मुक्त राहू शकत होते. कदाचित याच कारणास्तव आणि भयंकर अरण्यात तपश्चर्येसाठी आवश्यक एकांताची उपलब्धता असल्यामुळे दंडकारण्य रामायण आणि महाभारताच्या काळातील महान ऋषी-मुनींचे तपोभूमी होती. रामायणात उल्लेखित अनेक प्रमुख ऋषींचे आश्रम दंडकारण्य (छत्तीसगड) येथे होते. रामायण काळ हा भारतीय संस्कृतीचा उत्तरेकडून दक्षिणेकडे सतत प्रसार करण्याचा काळ होता. या कार्याची जबाबदारी ऋषींची होती आणि दंडकारण्य हे या ऋषींना आश्रम स्थापन करण्यासाठी, तपश्चर्या करण्यासाठी आणि यज्ञ करण्यासाठी सर्वात अनुकूल स्थान होते. उत्तर आणि मध्य भारतातील ऋषी हे वसिष्ठ, विश्वामित्र, वाल्मिकी आणि अत्री होते. दंडकारण्याच्या सीमेवर अत्रि ऋषींचा आश्रम होता. शरभंग ऋषींचा आश्रम दंडकारण्यात होता आणि अगस्त्य ऋषींचा आश्रम दंडकारण्य आणि दूर दक्षिणेमध्येही होता. अगस्त्य ऋषींचा मुख्य आश्रम दक्षिण भारतात असला तरी ते आणि इतर ऋषी दंडकारण्य (दक्षिणपथ छत्तीसगड) मार्गाने उत्तर-दक्षिण जात येत राहिले. मुख्यतः भारतीय संस्कृतीचा दक्षिणेकडे प्रसार करण्याचे काम अगस्त्य ऋषींवर होते. विंध्याचल ओलांडून दक्षिणेकडे संस्कृतीचा प्रसार करणारे ते पहिले ऋषी होते. या संदर्भात एक पौराणिक कथा आहे की जेव्हा ते विंध्याचल पर्वत ओलांडत होते तेव्हा विंध्याचलने त्यांना झुकून वंदन केले. तेव्हा त्यांनी त्याला मी परत येईपर्यंत असाच उभा राहण्याचा आदेश दिला होता.

लोककथा आणि लोकश्रद्धेनुसार लोमश ऋषींचा आश्रम राजीममध्ये आणि वाल्मिकींचा आश्रम तुर्तुरिया येथे होता. शृंगी ऋषींचा आश्रम नागरी-सिहवाच्या पहाडावर होता. याच शृंगीने राजा दशरथाचा पुत्रष्टी यज्ञ केला होता.याशिवाय, प्रचलित समजुतीनुसार, शहराजवळील सोंधादूरच्या आसपास वेगवेगळ्या पहाडांवर सप्तशीयांचा आश्रम होता. मुचकुंद, शरभंग, अंगिरा, पुलस्त्यकर्क आणि इतर अनेक ऋषींचे आश्रम छत्तीसगडच्या पवित्र भूमीत होते. दंडकारण्य येथील अगस्त्यांचा आश्रमही याच पहाडांवर वसलेला होता. मातंग ऋषींचा एक आश्रम शिवनारायणाच्या परिसरातदेखील होता. राम आणि शबरी यांची भेट इथेच घडली आणि उष्ट्या बोरांची घटना तेथेच घडली.

वाल्मिकी हे राम आणि दशरथ या दोघांचे समकालीन होते.या तपस्वी ऋषींचे वर्णन त्यांनी



रामायणातील अरण्यकांडात केले आहे की, त्यांच्यापैकी कोणी मरिचिपा होते ज्यांनी फक्त सूर्याची किरणे पिऊन तपश्चर्या केली, कोणी अश्मकुट होते जे दगड चघळणारे होते, कोणी पत्र-आहार हे केवळ पानांच्या आहारावर अवलंबून होते. काही दन्तउलूखलिन होते ज्यांनी जिभेची चव सोडून फक्त दातांनीच अन्न ग्रहण केले, काही गात्रशय होते, काही आकाशनिलय होते ज्यांच्या दृष्टीने आकाशच त्यांचे घर होते.काहींनी आयुष्यभर ओले वस्त्र परिधान करणारे आद्रपटधारी होते आणि त्यांनी त्या स्थितीत तपश्चर्या केली. असे अनेक ऋषी दंडकारण्यात तपश्चर्या करत होते.

रामायण काळात छत्तीसगडची संपूर्ण भूमी अशा ऋषी, मुनी आणि तपस्वी यांच्या यज्ञ, तपश्चर्या, ध्यान, धार्मिक चिंतन, शिक्षण संशोधन आणि सांस्कृतिक चिंतनाने भरलेली होती, परंतु त्याच वेळी, लंकाधिपति राक्षसराज रावण आपल्या राज्याचा विस्तार करण्याच्या इच्छेने दंडकारण्य जनस्थानला सतत भेट देत होता आणि हात-पाय पसरण्याचा दृष्टीने हालचाल करत होता. त्यांचे सेनापती खार, दुषण, ताटका, सुबाहू, मारीच यांच्यासह चौदा हजार राक्षसी सैन्य दंडकारण्यातील ऋषींच्या यज्ञांचा अखंड नासधूस करत होते. ते ऋषीमुनींचा छळ करत होते आणि नरभक्षक असल्या कारणाने त्यांचे भक्षण करत होते. रामाने जनस्थानात अशा ऋषींच्या हाडांचे अनेक ढीग पाहिले होते. रामाचे आगमन होताच, ऋषीमुनींच्या एका मोठ्या समूहाने रामाला घेरले आणि त्यांना होत असलेल्या त्रासाचे कथन केले. 'निसिचर निकर सकल मुनि खाए...' तेव्हा राम ऋषींना धीर देत म्हणाले,'निसिचर हीन करउँ महि भुज उठाइ पन कीन्ह' मी माझ्या वडिलांच्या सांगण्यावरून जंगलात आलो आहे, परंतु मी तुमच्या लोकांकडे सेवक म्हणून आलो आहे. ही सर्व क्रूरता आता तुमच्या परवानगीने संपेल. लक्ष्मणासोबत माझे शौर्य तुम्ही पहा आणि मग राम-लक्ष्मण भयंकर राक्षसांचा नाश करतात. अशी एक प्रचलित धारणा आहे की, या राक्षसाच्या संहारामुळे आजही नारायणपूरमधील राकस हाडा येथील एका छोट्या पहाडावर राक्षसांची हाडे दगडांच्या स्वरूपात आढळतात. त्यांना जळल्यावर त्यांचा हाडांसारखा वास येतो. या श्रीरामांनी मारलेल्या राक्षसांच्या अस्थी आहेत असा प्रचलित समज आहे. राकस हाडा म्हणजे 'राक्षसांची हाडे'. जवळच रक्षा डोंगर देखील आहे, ज्यात एक गुहा आहे, प्रचलित मान्यतेनुसार श्रीरामांनी सीता आणि लक्ष्मण यांना सुरक्षिततेसाठी या गुहेत पाठवले होते. प्रचलित मान्यतेनुसार, श्री राम सीतामढी कोरियातून छत्तीसगडमध्ये प्रवेश करतात आणि तिथून कोन्टा बस्तरच्या पलीकडे आंध्र प्रदेश आणि किष्किंधा प्रदेशात प्रवेश करतात. छत्तीसगड हे रामकथेशी संबंधित ठिकाणे, आश्रम, रामजन्माचा यज्ञ करणारे शृंगी ऋषी, वाल्मिकी, माता कौशल्या, सीतामढी हरचौका, सीता बेंगरा गुंफा, रामगढ सुरगुजा, रतनपूर पहाडी, पैसार घाट, महानदी, शिवनारायण, लक्ष्मणेश्वर आदींशी संबंधित आहे. खारोद, तुर्तुरिया, सिरपूर, राजीम, रक्षा डोंगरी, नारायणपूर हे बस्तरमधील विविध लोकप्रिय ठिकाणे आहेत. आरण्यक प्रवासाचे मार्ग नदीच्या काठाजवळून किंवा जवळून जात होते जेणेकरून पाणी उपलब्ध व्हावे. तसेच रामकथेत दंडकारण्यमधील गामी ऋषींच्या आश्रमांचा उल्लेख आहे, तो आश्रमदेखील नदीच्या काठावर वसलेला होता. त्यामुळे दंडकारण्याच्या नद्याही रामाच्या प्रवासात आडव्या आल्या असाव्यात. प्रवासाच्या मार्गातील या संभाव्य लहान-मोठ्या नद्या म्हणजे सरगी, चित्रोत्पाला (महानदी), इंद्रावती, कांगेर आणि इतर अनेक नद्या आहेत.

# मराठवाडा ग्रामीण संस्थेचे कार्य कौतुकास्पद : डॉ. नीना बोराडे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दि 20ऑक्टोबर मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, औरंगाबाद आणि आरोग्य विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभागात स्थानिक पातळीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ दि २० ऑक्टोबर रोजी सिव्हिल हॉस्पीटलच्या दालनात संपन्न झाला. यावेळी कार्याक्रमाचे अध्यक्षस्थानी नांदेड जिल्ह्याचे DRCHO डॉ नीना बोराडे, तर ADHO डॉ संदेश जाधव, RMO डॉ हनुमंत पाटील, जिल्हा वरिष्ठ सल्लागार डॉ व्यंकटेश गुडे प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

ग्रामीण भागात कोविड 19 आणि बालकांचे सर्व प्रकारचे नियमित लसीकरण या विषयी समाजात जनजागृती करून लोकांना लसीकरणासाठी प्रेरित करणे हे अत्यंत मोलाचे कार्य मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, औरंगाबाद या संस्थेतर्फे नांदेडमध्ये प्रशासनाच्या सोबत येऊन अवघड काम सुलभ करण्याचे कार्य करीत आहे हे विशेष आहे असे उदगार DRCHO डॉ नीना बोराडे यांनी व्यक्त केले. यापुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आता कोविड गेला आहे असे आपल्याला माहित आहे परंतु अजूनही अनेक साथीचे रोग आपल्याकडे आहेत आणि त्यापासून आपल्या बालकांना संरक्षित करण्यासाठी नियमित लसीकरण महत्वाचे आहे.

जानेवारी २०२२ पासून मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, औरंगाबाद आणि आरोग्य विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर USAID च्या सहकार्यातुन सुरू असलेल्या मोमेंटम रुटीन इम्युनायझेशन ट्रान्सफॉर्मेशन अँड इक्विटी या प्रकल्पांतर्गत कोविड १९ आणि बालकांचे लसीकरण या विषयी जनजागृती करून नियमित लसीकरणावर




भर देण्यात येत आहे. यामध्ये लसीकरणासाठी लोकांचा उस्फुर्त सहभाग मिळत असून लसीकरणाची टक्केवारी वाढत असल्याचे समोर येत आहे. या प्रसंगी लसीकरण प्रक्रियेत सहभागी असणारे स्थानिक पंचायत सदस्य, पंच-सरपंच, लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी, ANM, स्टाफ नर्स, आर एम ओ, आशाताई, अंगणवाडी शिक्षिका सेविका, आरोग्यदूत या सर्वांचा संस्थेचे प्रशस्तीपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करणायत आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समन्वयक वैशाली नेवे यांनी केले तर गेल्या दोन वर्षात संस्थेतर्फे जिल्ह्यात झालेल्या उपक्रमांची रूपरेषा अनुप मोरे यांनी सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका समन्वयक शिवकन्या कैलवाड आणि साईनाथ भिसे यांनी केले तर आभार प्रदर्शन संगीता भालेराव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्योती पारडे, रामेश्वर वजीरे, विपुल घंटे,व्यंकटेश रापतवार, विठ्ठल गोरे, यांनी परिश्रम घेतले.



# नवरात्रोत्सवाला ऑस्ट्रेलियन पाहुण्यांची भेट!

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या उलवे नोड येथे साजरा होत असलेल्या नवरात्रौत्सवाला ऑस्ट्रेलिया येथील पॉल यांनी भेट दिली व नवरात्रौत्सवातील गरबा - दांडियाचा आनंद लुटला. यावेळी यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या नवरात्रोत्सव कमिटी तर्फे, परदेशी पाहुण्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या वेळी आपल्या मनोगतात पॉल यांनी महेंद्र घरत यांच्या आंतरराष्ट्रीय कामगार क्षेत्रातील कार्याबद्दल गौरवोद्‌गार काढले. आयटीएफ , आयएलओ या जगातील श्रेष्ठ संघटनांवर भारतीय कामगार चळवळीचे नेतृत्व करत आपला दबदबा जागतिक पातळीवर उमटवीत आहेत. परंतु तरीही त्यांची नाळ या मातीशी जोडलेली आहे. समाजातील गोरगरिबांनी आनंद साजरा करावा म्हणून ते नवरात्रोत्सवाचे आयोजन करून जनतेला आनंद देत आहेत . तर रुग्णवाहिका, गोरगरिबांना शिक्षणासाठी मदत अनेक बेरोजगार युवकांना रोजगार देण्याचे अलौकिक काम ते करीत आहेत. म्हणूनच कामगार क्षेत्रातील जागतिक नेतृत्व त्यांच्या प्रेमात आहेत आणि आम्ही त्यांच्या सोबत काम करीत आहोत ते आमचे मित्र असल्याचा सार्थ अभिमान आहे.असे गौरवोदगार त्यांनी यावेळी काढले. यावेळी दिल्ली येथील अरविंद कौशल, मिलिंद पाडगांवकर, अखलाक श्रीलोत्री, किरीट पाटील, वैभव पाटील, अनिलशेठ घरत, गणपतशेठ घरत, मनोज फडकर आदि मान्यवर उपस्थित होते.

# महिलेवर हल्ला करणारी वाघीण जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मौजा रामाळा येथील शेतशिवारात धान कापणीसाठी गेलेल्या महिलेवर हल्ला करुन तिचा बळी घेणाऱ्या टी-१३ वाघिणीला मौजा मुलुरचक येथे जेरबंद करण्यात वनखात्याला यश आले. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे व नेमबाज अजय मराठे यांच्या चमूने ही कामगिरी केली. मानव-वन्यजीव संघर्षात आतापर्यंत ६० वाघांना त्यांनी जेरबंद केले. वाघिणीला जेरबंद करण्यासाठी सापळा रचून कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले. अवघ्या तीन दिवसांत वाघिणीला जेरबंद करण्यात यश आले. या वाघिणीला गोरेवाडा बचाव केंद्रात आणण्यात येत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वनसंरक्षक एस. रमेशकुमार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई पार पडली. यावेळी वडसा उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक वनसंरक्षक संदिप भारती, वनपरिक्षेत्र अधिकारी पवनकुमार जोंग, अविनाश मेश्राम, क्षेत्र सहाय्यक राजेंद्र कुंभोर, अजय उरकुडे आदी सहभागी होते. तसेच वाघिणीला जेरबंद करणाऱ्या चमुमध्ये दिपेश टेंभूर्णे, योगेश लाकडे, गुरुनानक ढोरे, वसीम शेख, विकास ताजने, प्रफुल वाटगुरे, निकेश शेंदे, मनान शेख तसेच गडचिरोली जलद बचाव पथकातील आशिष भोयर, अजय कुकडकर, मकसुद सय्यद, गुणवंत बावनथडे, पंकज फरकाडे, निखील बारसागडे व इतर वनकर्मचारी उपस्थित होते.

# शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांची आढावा बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मंठा विधानसभा मतदार संघातील शिवसेना पदाधिकारी व शिवसेनिकांची आढावा बैठक शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल याच्या आध्यक्षतेखाली परतूर येथील जिल्हा कार्यालयात संपन्न झाली. यात शिवसेना पक्ष संघटनात्मक बांधणीवर जोर देण्यात आला.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या दसऱ्यानिमित्त मुंबई येथे होणाऱ्या सभेस जाण्या संदर्भात चर्च्याही करण्यात आली या बैठकीस शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल, प्रल्हाद बोराडे, उपजिल्हा प्रमुख बाबासाहेब चिखले, परतूर तालुका प्रमुख अमोल सुरुंग, उद्यसिंह बोराडे,वैद्यकीय मदत कक्षाचे विधानसभा प्रमुख शिवाजी तरवटे, परतूर शहर प्रमुख दीपक हिवाळे, मापेगाव (खु) सरपंच दिनकर शेंडगे, हनुमान खरात, मिथुन चव्हाण, कैलास पुरी, मधुकर निलेवाड, विभाग प्रमुख अमोल धुमाळ, राजाराम भांडवलकर, युवासेना तालुका प्रमुख अविनाश कापसे, उप तालुका प्रमुख सोपान कातारे, अल्पसंख्याक तालुका प्रमुख शेख खाजा, मंठा उप तालुका प्रमुख गजानन कापसे, उप तालुका प्रमुख विलास राठीड ,मंठा दलीत आघाडी तालुका प्रमुख दिलीप हीवाळे, दिपक गायकवाड, प्रमुख अॅड. राजेश खरात, श्रीष्टी विभाग प्रमुख नितिन राठोड, गजानन आकात, तळणी विभाग प्रमुख सिधु जाधव, खोराड सांवगी विभाग प्रमुख माऊली वायाळ, शरद डोईफोडे, पाटोदा सर्कल प्रमुख अर्जुन राठोड, संदीप चव्हाण व मंठा शाखा प्रमुख गणेश बोराडे यांची उपस्थिती होती.

# कमळजा मातेचा नवरात्रोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथे नवरात्रोत्सवात कमळजा मातेचे दर्शनसाठी विदर्भासह मराठवाड्यातील भाविकांनी केली गर्दी. लोणार सरोवरातील दाट वनराईत कमळजा मातेचे हेमांडपंथी मंदिर आहे. कमळजा माता ही भक्तांच्या नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे.कमळजा देवी मंदिरासमोर सासू-सुनेची विहीर आहे. या विहिरीचे अर्ध्या बाजूकडील पाणी खारट आहेत. लोणार सरोवरातील कमळजा माता देवीचे मंदिर हे जवळपास १ हजार वर्षे जुने आहे. विदर्भ- मराठवाड्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कमळजा मातेचा मंदीर हे सरोवराच्या काठावर असल्याने या जंगलातून पायी चालतच जावे लगाते. लोणार सरोवर वन्यजीव अभ्यारण्य घोषित झाल्यानंतर या विभागाकडून सरोवरात जाण्या येण्याला काही अटी आणि नियम आहे.या क्षेत्रात जंगली प्राण्यांचा मुक्त संचार असतो त्यामुध्ये प्रामुख्याने बिबट् ,कोल्हे, तडस यासारखे हिस्त्र प्राणी तसेच विषारीसाप सुध्दा असल्याने दर्शनासाठी गटागटाने,तसेच वनविभागाने नेमून दिलेल्या पायवाट रस्त्याचाच वापर करावा भाविक करत आहे. नवसाला पावणारी देवी असल्याने भाविक भक्त मोठ्या श्रध्देने येतात. निसर्गरम्य वातावरणात भाविकांची उपस्थिती मुळे मंदिर परिसर फुलून गेला आहे.



लोणार सरोवरामध्ये कमळजा माता प्राचीन काळापासून विराजमान आहे .भाविक मोठ्या उत्साहाने दूरवरून दर्शनाला येतात पूर्वी नवरात्रोत्सव दरम्यान मंदिर दर्शनाला २४ तास खुले असायचे रात्रीच्या वेळी पण दर्शन घेण्यासाठी गर्दी असायची परंतु लोणार सरोवर वन्यजीव अभयारण्य घोषित झाल्यानंतर काही निर्बंध व अटी लावण्यात आल्या आहे . आता दिवसातच दर्शन घेता येते .आज कमळजा मातेला प्रार्थना केली आमच्या शेतकरी राजाला सुखी ठेव आणि शेतमालाला चांगला भाव मिळू दे . **शैलेश सरकटे, भाविक**





गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# संस्कार प्रबोधिनीत चित्रकला स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** शहरातील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयामध्ये १०० शिक्षक क्लब तर्फे नवरात्रोत्सवनिमित्त मतदान जनजागृती या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४४ शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या उपक्रमाचे आयोजन उपक्रमशील शिक्षक रामदास कुलकर्णी यांनी केले होते. विद्यार्थ्यांनी लोकशाही शासनपद्धतीचे महत्त्व चित्रस्पर्धेच्या माध्यमातून पटवून दिले. स्पर्धकांनी मतदान जनजागृतीवर विविध चित्रे रेखाटून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी चित्राच्या माध्यमातून मतदान हे सर्वश्रेष्ठ दान असून लोकशाहीचा तो कणा आहे.लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, अशा प्रकारचा संदेश स्पर्धकांनी दिला. या उपक्रमाबद्दल संस्था अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, सचिव विजय देशमुख,प्रा.राम भाले, विनायकराव देशपांडे, प्रा. केशरसिंह बगेरीया मुख्याध्यापक ईश्वर वाघ आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# विविध सामाजिक प्रश्नांवर पथनाट्यातून समाज प्रबोधन

**वैजापूर :** नवरात्र उत्सव निमित्त सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या निर्मला इन्स्टिट्यूटच्या मुलां-मुलींनी बेटा बेटी समान,मोबाईल दुष्परिणाम, वाढते पर्यावरण मानवी जीवितास घातक, विडी, काडी सिगारेट व दारूचे दुष्परिणाम व मुलींच्या महिलांच्या सक्षमीकारणास शिक्षण महत्व या विषयावर वैजापूर शहरातील गल्लो-गल्ली,व वॉर्डा-वॉर्डात जाऊन २०,२१,२२ ऑक्टोबर,२०२३पर्यंत पथ नाट्य सादर करून समाज जागृती केली. या पथनाट्यतुन समाजमनाचे निश्चित परिवर्तन होईल व समाजातील व्यसन व विकार,पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक निर्मूलन, सिगारेट व दारू दुष्परिणाम, मोबाईल वापर दुष्परिणाम या बाबत समाज जागृत होईल, असे प्रतिपादन तालुका तंबाखू नियंत्रण समितीचे माजी अध्यक्ष व विद्यमान सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी रविवार (ता.२२)रोजी इंदिरानगर, दुर्गानगर संत रोहिदास नगर येथील पथनाट्य कार्यक्रमात केले. या प्रसंगी पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक विजय नरवाडे, प्रशिक्षक ज्युरान लुपिस, श्रीयुत मॅक्स,संचालिका नॅन्सी रोद्रीग्ज, मार्गारिट दिब्रेटो, लिलीयन डिसुझा,वंदना बनसोड, अश्विनी गायके, छाया बंगाळ, छाया भारती याच्या सह नागरिक महिला-पुरुष उपस्थित होते. इमरान सय्यद यांनी सूत्र संचलन केले तर मार्गारिट यांनी आभार मानले,या पथनाट्य माध्यमातून तालुकाभर जनजागृती करण्यात येणार असे नॅन्सी यांनी सांगितले.

# रमेश राऊत यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीक्षेत्र राजूर :** सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना नागपूर येथील मदत सामाजिक संस्थाद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार दिला जातो. नुकतीच या पुरस्काराची घोषणा झाली असून जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रमेश राऊत यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

मदत या संस्थेद्वारे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी राजुर येथील रमेश राऊत यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. 5 नोव्हेंबर रोजी एका विशेष पुरस्कार समारंभ सोहळ्यात आकर्षक स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन हा पुरस्कार दिला जाणार आहे.

राऊत यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वय समिती अध्यक्ष अरुण जाधव, समता शिक्षक संघटनेचे जालना जिल्हा अध्यक्ष अच्यूत साबळे, सचीव परमेश्वर साळवे, सिध्दार्थ गजभिये, सावता तांबेकर, माजी सभापती भाऊसाहेब काकडे, केंद्रप्रमुख रमेश पुंगळे, अण्णा इंगळे, सुभाष तळेकर, राजेंद्र निहाळ, भास्कर घुगे, दादासाहेब घोरपडे, विनोद दाभाडे, गजानन भूमकर, वल्लभ गाढे, राहूल ढोक, श्रीमंता बोर्डे, संतोष मगरे, संजय मगरे, दादाराव मगरे, आदमाने, जावळे सर, प्रा.अभोरे, गजानन इंगळे, गुलाबराव मगरे, बाबूराव दाभाडे, भगवान रगडे, संतोष बोर्डे, अशोक मगरे, मनोज जाधव,अमोल साबळे, जगन बोर्डे, काळूबा मगरे, कृष्णा मगरे आदींनी अभिनंदन केले आहे.



# कन्नड ग्रामीण रुग्णालयात आरोग्य मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे केंद्र शासनाची प्रणित आयुष्मान भवः योजनेअंतर्गत आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. ह्या मेळाव्याचे उद्घाटन आमदार उदयसिंग राजपूत यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती डी. वाय. एस.पी. विजयकुमार ठाकूरवाड साहेब, निवासी वैदयकीय अधिकार डॉ. प्रशांत बडे यांची होती. ह्या मेळाव्यात एकूण 1058 रुग्णांची तपासणी करण्यात आली. ह्या मेळाव्यासाठी शासकीय वैदयकीय महाविद्यायालय छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. गिरिजा संगोराम (मानसोपचार तज्ञ), डॉ. समृद्धी जैन (नेत्ररोग तज्ञ), डॉ. अविनाश सुरवाडे (सर्जन), डॉ. जलजा बी (बालरोग तज्ञ), डॉ. पवन काकडे ह्या तज्ञ डॉक्टरांनी ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे आलेल्या सर्व रुग्णांचे तपासणी व उपचार केले. याप्रसंगी 120 दिव्यांग लाभार्थ्यांना आमदार उदयसिंग राजपूत यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सदर मेळावा मा. जि. शल्य चिकीत्सक डॉ. दयानंद मोतिपवळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील वैदयकीय अधीक्षक डॉ. प्रवीण पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा गिते, डॉ. ए. आर. गायकवाड, डॉ. शेख सोहेल अहमद, डॉ. रुजुता थोरात, डॉ. रुपेश मोटे, डॉ. भूषण डहाके, डॉ. जितेंद्र शिंदे, डॉ. सिकंदर कुरैशी, डॉ. अंकुश गोरे, डॉ. राजश्री हूसे, बलदेव राजपूत, परिसेविका श्रीमती. मंदा वसावे व सर्व परिचारिका यांनी परिश्रम घेऊन हा मेळावा यशस्वी केला.

कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण पवार यांनी सर्वांचे आभार मानले.



# मूल्यमापनात शैक्षणिक धोरणासह अध्ययन निष्पत्ती व तंत्रज्ञानाचाही विचार

## पुण्यात पार पडला दोनदिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण वर्ग

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना वापरण्यात येणाऱ्या विविध साधनतंत्रांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह अध्ययन निष्पत्ती व तंत्रज्ञानाचाही विचार व्हावा आणि त्यादृष्टीने अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनात बदल करण्यात यावा. यासंदर्भात राज्यभरातील शाळांमध्ये करण्यात येणारे मूल्यमापन एकजिनसी व्हावे या हेतूने पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र येथे राज्यस्तरीय प्रशिक्षण वर्ग पार पडला. विद्यार्थ्यांच्या संपादणुक पातळीचा स्तर उंचावण्यासाठी दोनदिवशीय प्रशिक्षण वर्गात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण, नियतकालिक मूल्यमापन चाचण्या, कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन, आकारिक मूल्यमापन, मूल्यमापनासाठी तंत्रज्ञानाचा एकात्मिक वापर, मूल्यमापनाचे प्रकार व साधने तंत्रे, अतिरिक्त पूरक मार्गदर्शन, अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन, मूल्यमापनाचे अभिलेखे, गुणवत्तापूर्ण मूल्यमापनाचे प्रश्न विकसित करणे, समग्र प्रगती पत्रक, इयत्ता पाचवी व आठवीच्या परीक्षा आदी विषयांवर एससीईआरटीच्या भाषा व समन्वय विभाग उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, उपविभागप्रमुख वर्षाराणी भोपळे, संशोधन विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय थिटे, वरिष्ठ अधिव्याख्याता महादेव वांडरे, डॉ. गीतांजली बोरूडे, अधिव्याख्याता डॉ. शशिकांत शिंदे, चंदन कुलकर्णी, विषय सहाय्यक डॉ. जितेंद्र काठोळे, प्रदीप देवरे, कानिफनाथ साठे, डॉ. बाबासाहेब पवार, उमेशचंद्र खेडकर आदींनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गासाठी राज्यभरातील तज्ज्ञ शिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. राज्यस्तरीय प्रशिक्षणानंतर हे तज्ज्ञ शिक्षक विभाग व तालुक्यावर मार्गदर्शन करून शिक्षकांपर्यंत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात झालेले बदल पोहोचविणार आहेत.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# सुरेश सिरसीकर कार अपघातातून बचावले

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** होल्डिंग हँड्सचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर मोठ्या कार अपघातातून बचावले. पुण्याहून छत्रपती संभाजी नगरला पोहचत असताना सकाळी साढे पाच च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर च्या २५ ते ३० किलो मिटरच्या अंतरावर ड्रायव्हरला डुलकी लागल्याने ड्रायव्हरच्या गाडीवरचा ताबा सुटला आणि गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल लवणात पडली. लवणात भरपूर झाडी असल्याने रस्त्यावरून पाहिली तर गाडी दिसत नव्हती. अपघात जरी मोठा असला तरी कुठलीच जीवितहानी झाली नाही. सुरेश सिरसीकर यांनी गाडीचा लगेच दरवाजा काढून बाकी सोबतीना ही वाचविले. सिरसीकर यांना किरकोळ दुखापत झाली असून आता प्रकृती स्थिर आहे.

सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही देश पातळीवर काम करीत असून दिल्ली, पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते.




# वाशिम जिल्ह्यात 'यूपीएससी'चे विद्यार्थी घडविण्यावर विशेष भर देणार

## समीर वानखेडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** जिल्ह्यात अतिशय हुशार विद्यार्थ्यांची संख्या बरीच असून, त्यांना योग्य मार्गदर्शन लाभल्यास ते युपएससीमधे यशस्वी होऊ शकतात. त्यामुळे आगामी काळात विदर्भात विशेषतः वाशिम जिल्ह्यात युपएससीसाठी विद्यार्थी घडाविण्यावर आपण विशेष भर देणार आहोत. त्यासाठी विविध सेमिनार आयोजित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असल्याचे प्रतिपादन एनसीबीचे माजी विभागीय संचालक तथा केंद्रीय करदाते सेवा संचालनालयाचे चेन्नई येथे कार्यरत असलेलले अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे यांनी केले आहे. वाशिम जिल्ह्यात आगामी आठ दहा वर्षात किमान दहा ते बारा आयएएस अधिकारी बनविण्याचा मानस देखील वानखेडे यांनी व्यक्त केला.ते रिसोड नजीकच्या सवड येथे एका कार्यक्रमा



दरम्यान बोलत होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले, विदर्भात खासकरून वाशिम जिल्ह्यात अभ्यासू व मेहनती विद्यार्थ्यांची संख्या खुप आहे. मात्र त्यांचा एमपीएससी कडे कल दिसतो पण त्यांनी थोडी मेहनत घेतल्यास ते सहज युपएससी परीक्षेत यशस्वी होऊ शकतात. युपएससीची तयारी वेगळी नसून दोन्हीही परीक्षेची प्रक्रिया सारखीच असते. त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन व अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध करून दिल्यास हमखास यशस्वी होऊ शकतील अशी मला खात्री आहे. त्यासाठी आपण विशेष भर देणार असून,येत्या काही वर्षांत जिल्ह्यातील किमान दहा ते बारा उच्चपदस्थ अधिकारी बनविण्याचा माझा संकल्प आहे..! असे समीर वानखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. सदर कार्यक्रमास रिसोडच्या तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांची विशेष उपस्थिती होती.दरम्यान तेजनकर यांनी रिसोड शहरात राबविलेल्या प्लास्टिक मुक्ती मोहीम व त्याबाबत केलेली विशेष जनजागृती या स्तुत्य उपक्रमाचे वानखेडे यांनी कौतुक केले. तद्वतच प्लास्टिक मुक्ती ही काळाची गरज ओळखून, सर्वमान्य जनतेने तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांना सहकार्य करावे, असे आवाहन देखील केले. याप्रसंगी विष्णूपंत खाडे, सरपंच विलास शेळके, उपसरपंच दशरथ मोरे, रमेश लाटे, प्रकाश मस्के, उत्तमराव घोडे, गजानन खंडागळे, अरुण मंडलिक, संजय राऊत,विजू पंडीत, राम कापुरे, प्रकाश शेळके, प्रकाश जुमडे, सतीश तिवारी, विवेक शेळके, विनायक पंडित, शालिक शेळके, मंचकराव देशमुख, ज्ञानेश्वर जाधव,थोरात, नंदू कांबळे आदीसह बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.



**आधुनिक केसरी सोबत विशेष मुलाखत**

माझ्या कार्यकाळातील बहुचर्चित झालेले ड्रग्ज प्रकरण ही मी केलेली एक किरकोळ कारवाई आहे . गेल्या १५ वर्षाच्या सेवेत आपण १७ हजार किलो अमली पदार्थ आणि १६५ किलो सोने सरकारला जप्त करून दिले आहे . तसेच तब्बल ३५० हून अधिक अमली पदार्थ तस्करांना अटक केली आहे . त्यात दाऊद इब्राहिमचा भाऊ इक्बाल कासकर यांच्या " डी " कंपनीचा साथीदार आरीफ भुजवला याचा देखील समावेश आहे . आणि विशेष म्हणजे इसिसच्या आरोपीला भारतात पहिल्यांदा अटक करण्याचे धाडस केले आहे .मात्र, आपल्या मीडियाने केवळ ड्रॅग्ज प्रकरणाले विशेष वलय दिलंय याचं आश्चर्य वाटते असे असे मत अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे यांनी दैनिक आधुनिक केसरीचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी वसंत खडसे यांच्या सोबत झालेल्या मुलाखतीत व्यक्त केले आहे .

# लोणंद शहरात गरबा दांडियाने महिलांमध्ये उत्साह

## लोणंद बाजारतळ, कृषिराज लॉन्स येथील आयोजनाबद्दल कौतूक

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** आज लोणंद हे विविध उत्सव तसेच उपक्रमांतून चांगलेच चर्चेत येऊ लागले आहे. मोठ मोठ्या शहरातील उत्सवाप्रमाणे लोणंदला सुद्धा नागरिकांचा उत्साह वाढविणारे उत्सव पार पडू लागलेले आहेत. यात महिला सुद्धा सहभागी होत आहेत. गरबा दांडिया हा प्रकार महिलांना, मुलींना व एकंदरीत ज्यांना आवड आहे, अशा प्रत्येक व्यक्तीला आनंद व समाधान मिळवून देत आहे. हा नृत्य प्रकार लोणंद सारख्या शहरात सुद्धा अनुभवता येत आहे. लोणंद शहरात काही ठिकाणी महिलांसाठीच नव्हे तर ज्यांना गरबा दांडिया खेळण्याची इच्छा आहे, अशा सर्वांनाच दांडिया हातात घेण्याची संधी नवरात्र उत्सवामुळे मिळालेली आहे. काही नवरात्र उत्सव मंडळांनी सुद्धा गरबा दांडियाचे आयोजन करत हा आनंद घेतला आहे. इतरांना ही दिला आहे. तसेच गरबा दांडिया कार्यक्रमात सहभागी होण्याचे व एखाद्या ठिकाणी महिलांना व गरबा व दांडिया प्रेमींना आमंत्रित करत एक संधी उपलब्ध करून देण्याचं काम सुद्धा करण्यात आले.लोणंदच्या बाजार तळावर घेण्यात आलेला लोणंद फेस्टिव्हल असो किंवा कृषिराज लॉन्स येथे पार पडत असलेला गरबा दांडिया असो या दोन्ही ठिकाणी महिलांनी गरबा दांडिया खेळत अगदी मनमुरादपणे आनंद लुटला. पुरुषांनी सुद्धा हातात दांडिया घेत आनंद घेतला. इथे कोणत्याच वयाला बंधन नसून अगदी वयोवृद्ध आजीबाई सुद्धा हातात दांडिया घेत एखाद्या तरुण मुलीला लाजवेल अशी दांडिया खेळताना दिसून आल्या.लोकांच्या पायाला नृत्याच्या माध्यमातून सादरीकरण करण्यास संधी मिळवुन देण्याचे काम लोणंद येथे नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने गरबा दांडियाच्या आयोजनातील कार्यक्रमातून पाहायला मिळाले. हे सगळं कसं एकदम झकासच... एकीकडे लोणंदच्या बाजारतळावर लोणंद फेस्टिव्हलच्या माध्यमातून आयोजक असलेल्या दर्शना रावळ, डॉ.स्वाती शहा, शैलजा खरात,प्र ज्ञा खरात, प्राजित परदेशी, अनिल कुदळे, संतोष खरात व त्यांच्या सहकाऱ्यांनी गरबा दांडियातून शहरातील उत्सवा प्रमाणे स्वरूप आणलेले आहे. तर दुसरीकडे कृषिराज लॉन्स येथे नगरसेविका तृप्ती राहुल घाडगे,सरगम प्लॅनेट डान्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत असलेल्या गरबा दांडियातून सुद्धा अनेक महिलांनी सहभाग घेतला. या ठिकाणी सुध्दा एक वेगळाच उत्साह होता. नव दुर्गांचा शोध घेत लोणंद फेस्टिव्हलने साडीचोळी व सन्माचिन्ह देऊन सत्कार केला. तसेच महिलांप्रति जनजागृती ही केली. तर कृषिराज लॉन्स येथे गरबा, दांडिया व उत्तम ड्रेफरी तसेच लकी ड्रॉ तून महिलांना बक्षिसे जिंकून देण्याची संधी नगरसेविका तृप्ती राहुल घाडगे,सरगम प्लॅनेट डान्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमातून उपलब्ध करून देण्यात आली होती.प्रत्येक दिवशी महिलांनी बक्षिसे जिंकली. महिलांना आनंद घेता येणारे विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याने एक अनोखा माहोल निर्माण झाला होता.

ही एक सुंदर संकल्पना आहे : लोणंदच्या बाजारतळावर लोणंद फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला .यावेळी अर्चना दुरगुडे-शिंदे, सहाय्यक आयुक्त ( मंत्रालय ) यांना नवदुर्गा पुरस्कार देण्यात आला .यावेळी त्यांनी बोलत असताना ही एक सुंदर संकल्पना असल्याचे म्हटले .लोणंद फेस्टिव्हल मार्फत संयोजकांनी मला नवदुर्गेचा पुरस्कार दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानते . ही एक सुंदर संकल्पना आहे .लोणंद फेस्टिव्हल ही लोणंदच्या इतिहासात प्रथमच घडत आहे .तुम्ही स्त्रियांना खूप चांगले प्रोत्साहन देत आहात .या पुढे ही असेच कार्यक्रम हातून घडत राहोत .तुमचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देते .असे सुद्धा अर्चना दुरगुडे-शिंदे यांनी म्हटले .

# पांडुरंग स्कूलच्या जी.एस.पदी अनिरुद्ध मगर, सायली सोनवणे

## विद्यार्थ्यांनी अनुभवले निवडणूक, प्रचार, आचारसंहिता, मतमोजणी अन् जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** वैजापूर तालुक्यातील नागवाडी तलवाडा परिसरातील पांडुरंग इंग्लिश स्कूल शाळेत लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबवून जनरल सेक्रेटरीची निवडणूक ता 16 रोजी घेण्यात आली या निवडणुकीत मुलांमध्ये अनिरुद्ध गणेश मगर 6 वी तर मुली मधून सायली संतोष सोनवणे विजयी झाले.

1 लि ते सहावी असे एकूण 325 मतदार यांनी मतदान केले. विद्यार्थी समोरच मतमोजणी करण्यात आली. दोन दिवस प्रचार चालला 2 जागांसाठी एकूण 12 उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते.

उमेदवार अनिरुद्ध मगर, सायली सोनवणे, चंदनपरी एखडे, सोज्वळ जाधव, आराधया सोनवणे, तेजस्विनी सोनवणे, शिवराज जाधव,



साईराज सोनवणे, श्रेयस सोनवणे, अजिंक्य भोसले,सार्थक आहेर यांनी उमेदवारी अर्ज केले. निवडणूक आयोग, उमेदवारी अर्ज दाखल करणे, माघार, अर्ज छाननी आणि मतदान कसे करायचे या बाबतीत माहिति विद्यार्थ्यांना या उपक्रमात मिळाली. निवडणूक निकालानंतर विद्यार्थ्यांनी जल्लोष केला.

विजयी उमेदवाराचे सत्कार करण्यात आला तर पराभूत उमेदवार यांना सुद्धा भेट वस्तू देवून प्रोत्साहित करण्यात आले. या निवडणुकीत साईनाथ वाघ, निखिल वाघ, दिपाली तळेकर, राणी सुर्यवंशी, कीर्ती कुंदे , तणूजा कुंदे, कविता निकम, पूजा बागूल, योगिता सोनवणे शिक्षकांनी सहकार्य केले.

निवडणूक प्रक्रिया, निवडणूक आयोगाचे काम या बाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्देशाने आम्ही शाळेत निवडणूक घेतली . यातून विद्यार्थ्यांना सामाजिक न्यान मिळते याचा फायदा विद्यार्थ्यांना पुढील काळात होईल .

**– प्रा .संतोष सूर्यवंशी, अध्यक्ष पांडुरंग इंग्लिश स्कूल**

# विजयादशमीच्या मुहूर्तावर 'नासाका' चा बॉयलर पेटणार!

## यंदा २.५० लाख मे टन गाळप होणार : इतर कारखान्याप्रमाणे दर, खा. हेमंत गोडसे यांची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** नाशिक,इगतपुरी,सिन्नर आणि त्र्यंबकेश्वर या चार तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या नाशिक सहकारी साखर कारखान्याचा बॉयलर आज विजयादशमी च्या मुहूर्तावर पेटणार आहे. २०२३-२४ गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन शुभारंभ मंगळवार दि २४ रोजी सकाळी साडेनऊ वाजता प. पू १००८ महामंडलेश्वर स्वामी शंतीगिरी महाराज यांचे हस्ते आणि विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत असून विशेष म्हणजे यंदा सुमारे २.५०लाख मेट्रिक टन गाळप होणार आहे अशी माहिती नाशिक चे खासदार हेमंत गोडसे यांनी दिली. त्यामुळे चार ही तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आनंद झाला असून या वर्षी त्यांनी आपला ऊस नाशिक सहकारी साखर कारखान्यास दिला जाणार आहे असे बोलून दाखविले आहे. गेल्या नऊ वर्षापासून हा कारखाना बंद होता,त्यामुळे गेल्या नऊ वर्षात ऊस उत्पादक शेतक ऱ्यांना आपला



ऊस जिल्हा बाहेरील कारखान्यांना द्यावा लागत होता. स्थानिक साखर कारखाना पुन्हा सुरळीत सुरू झाल्याने समाधान व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी मे अष्टलक्ष्मी शुगर इथेनॉल अँड एनर्जी लिमिटेड या कंपणीने घेतला आहे. जुनाट यंत्रणा,विविध अडचणी तसेच अपुरा ऊसतोड कामगार या V अशा काही कारणांमुळे कसाबसा गळीत हंगाम पार पडला होता. तरीही त्या हंगामात जवळपास ६८ हजार मे टन उसाचे गाळप झाले होते. गेल्या वर्षी ऊसउत्पादक शेतकऱ्यांना एकरकमी सुमारे २४०१ रुपये प्रति टन उसाला दर मिळाला . विशेष म्हणजे कारखाना सुरू झाल्यामुळे जवळपास चारशे बेरोजगारांना रोजगार मिळाला. यंदा विक्रमी गाळ पाचे उदिष्ट ठेवल्यामुळे नाशिक,सिन्नर,इगतपुरी, त्र्यंबकेश्वर या चार तालुक्यातील सुमारे सतरा हजार सभासद शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यंदाचे गाळप वेळेत पूर्ण करण्यासाठी जवळपास अडीच हजार ऊस तोडणी कामगार नियुक्त केले आहेत. जिल्हा बाहेरील सर्वाधिक भाव देणाऱ्या खारखाण्यांप्रमाने नसाका आपल्या शेतकऱ्यांना भाव देणार आहे. त्यामुळे कुणीही बाहेरच्या कारखान्यांना आपला ऊस देवू नये, असे आवाहन खासदार गोडसे यांनी केले आहे. बॉयलर अग्नी प्रदीपन कार्यक्रमास कार्यक्षेत्रातील शेतकरी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन असे आवाहन खा हेमंत गोडसे, संचालक बी टी कडलग, शेरजाद पटेल,सागर गोडसे,नामदेव कड लग, रुकशिंग पटेल, भाग्यश्री गोडसे, विलास आडके,सरव्यवस्थापक जे सी कुरणे यांनी केले आहे.




इगतपुरी, सिन्नर, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर तालुक्याचे कार्यक्षेत्र असलेला नाशिक सहकारी सहकारी साखर कारखाना गेल्या दहा वर्षांपासून बंद होता . तेव्हापासून कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतक-यांना आपला ऊस जिल्ह्यातील रासाका, कादवा तसेच जिल्ह्याबाहेरील संगमनेर, अगस्ति आदि कारखान्याना द्यावा लागत आहे . या वर्षात ऊस वेळेवर न टुटने, उसापोटी मिळणार देयक लवकर हाती न येणे या ना अशा अनेक करनांनी कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी वैतागुन गेला आहे . नासाका सुरू झाल्याने मनस्वी आनंद आहे . **-अर्जुन भोर, सरपंच जनोरी, ऊस उत्पादक**

# मुंबई येथील दसरा मेळाव्यास उपस्थित राहा : प्रा. बळीराम मापारी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मुंबई येथे आझाद मैदानावर आयोजित शिवसेनेच्या



दसरा मेळाव्यास तालुक्यातील शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी यांनी केले आहे. दसरा मेळाव्यासंदर्भात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी, दि. २१ ऑक्टोबर रोजी शिवसेनेची बैठक पार पडली. यावेळी प्रा. मापारी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ते म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे सोने आत्मसात करण्यासाठी व हिंदुत्वाचे विचार ज्वलंत करण्यासाठी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी आझाद मैदानावर दि. २४ ऑक्टोबर रोजी दसरा मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्याला खासदार प्रतापराव जाधव व आमदार डॉ. संजय रायमूलकर उपस्थित राहणार आहेत. लोणार तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी, सरपंच, शाखाप्रमुख, उपतालुकाप्रमुख बाजार समिती संचालक, नगरसेवकांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक गावातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जास्तीतजास्त नवीन सभासद नोंदणी करावी, असेही आवाहन यावेळी प्रा. मापारी व शिवसेनेचे तालुकाप्रमुख भगवान पाटील सुलताने यांनी केले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख पांडुरंग सरकटे, खरेदी-विक्री संस्थेचे अध्यक्ष हिंमतराव सानप, उपाध्यक्ष युवराज सोनुने, युवासेनेचे तालुकाप्रमुख गजानन मापारी, बाजार समितीचे माजी सभापती डॉ. प्रदीप मोरे, शिव पाटील तेजनकर, माजी सभापती संतोष मापारी, कारभारी सानप, अल्पसंख्यांक महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष इम्रान खान पठाण, बाजार समितीचे संचालक भगवान कोकाटे, सुनिल सुलताने, मोतीराम डव्हळे, मारोतराव धांडे, गणेश डव्हळे, बळीराम बोबडे, तुकाराम दहातोंडे, विलास दराडे, विजय सोनुने यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# फुलंब्री येथे परीट समाजाची बैठक

## आरक्षणासंबंधी चर्चा, पदाधिकाऱ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे शनिवारी रोजी धोबी (परीट) समाजाची सभा संपन्न झाली असून, या मध्ये प्रामुख्याने धोबी (परीट) समाजाचे अनुसूचित जातीचे जाणीव पूर्वक काढून टाकण्यात आलेल्या आरक्षणाच्या प्रश्नावर सखोल चर्चा करण्यात आली. धोबी परीट समाज हा देशातील १७ राज्यांमध्ये अनुसूचित जातीमध्ये आहेत तर ११ राज्यामध्ये इतर मागास प्रवर्गात सामाविष्ट करण्यात आले. महाराष्ट्रातील भंडारा, गोंदिया व बुलढाणा येथील काही समाज बांधवांकडे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देखील आहेत. या आरक्षणा संबंधी शासनाने नियुक्त केलेल्या डॉ. दशरथ भांडे समिती च्या योग्य त्या शिफारशी व तपशीलवार अहवालासह स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, धोबी (परीट)समाज हा नैतिक दृष्ट्या खरोखरच मागासलेला व वंचित समाज आहे. परंतु या गरीब, प्रामाणिक,मेहनती व कर्तव्यनिष्ठ समाजाचा कुठल्याही बाबतीत विचार न करता समाजावर आजपावेतो अन्याय झालेला आहे.

करिता आतातरी केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या विभागात जवळपास १ वर्षा पासून आरक्षण संबंधीची फाईल अंतीम टप्यात असल्याचे समाजातील विशेष शिष्टमंडळ यांना सांगण्यात आले. यावर आता जास्त वेळ न दवडता लवकरात लवकर धोबी (परीट) समाजाला अनुसूचित जातीचे पुर्वरत आरक्षण देण्यात यावे,आम्हीं नव्याने आरक्षणाची मागणी करत नसून,जे आमचे आरक्षण जवळपास ४० ते ४५ वर्षापासून काढून घेण्यात आलेले आहे तेच आरक्षण देण्यात यावे. मग नसता राज्यातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील धोबी (परीट) समाज हा आक्रमक भूमिका घेईल. याचीही शासनाने दखल घ्यावी.अशी सखोल चर्चा या वेळी करण्यात आली. तसेच कोलते टाकळी येथील उपसरपंच श्री. विजय आहेर यांची छ. संभाजीनगर भाजपा जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी नियुक्ती झाल्यामुळे व बाळासाहेब शिंदे याची फुलंब्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) कार्याध्यक्ष पदी निवड झाल्यामुळे या दोन्ही ही पक्ष पदाधिकारी यांचे समाज बांधवाकडून या वेळी छोटेखानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाळासाहेब शिंदे, सुभाष तुपे, शिवाजी तुपे, ऋषिकेश तुपे,रवींद्र गायकवाड, नारायण जाधव,शेखर तायडे, शेखर तायडे, कपिल तायडे, युवराज जाधव, विठ्ठल जाधव, दिलीप गायकवाड, एकनाथ तायडे, दिगंबर राऊत,सुनील मोरे,संजय तायडे व मनीषाताई मोरे हे समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांच्या वतीने एकशे पन्नास लिटर दुधाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील लक्ष्मीमाता मंदिर परिसरात नवरात्रोत्सव निमित्ताने भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांच्या वतीने एकशे पन्नास लिटर दुधाचे वाटप भाविकांना करण्यात आले आहे. मंदिरात सकाळी चार वाजेपासूनच महिला भाविक नवरात्रोत्सवात देवीची मनोभावे पूजा करण्यासाठी गर्दी करत असतात.

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात लक्ष्मी मातेचे भव्यदिव्य मंदिर आहे. नवरात्रोत्सवामध्ये या लक्ष्मी माता मंदिरात महिला भाविक दररोज आगळावेगळा उपक्रम राबवत असतात. मागील गेल्या सहा दिवसांपासून महिला भाविक येथे दांडिया खेळतात. त्यामुळे दररोज मोठी गर्दी होत असते. दररोज भाविकांची गर्दी वाढत असल्यामुळे भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांनीएकशे पन्नास लिटर दुधाचे भाविकांना वाटप केले. यात सुमारे अडीच हजार भाविकांनी या दुधाचा लाभ घेतला आहे. लक्ष्मी माता मंदिरात भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, आनंदा ढोके, योगेश मिसाळ, माजी ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष राम बनसोड यांनी सकाळी सहा वाजता सामूहिकरीत्या महाआरती केली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात भाविकांची उपस्थिती होती.

# लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने आज नांदेड येथे प्रथम दसरा मेळावा

## संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे करणार मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने



आज मंगळवार, दि. 24 ऑक्टोबर रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा मोंढा, नांदेड येथे प्रथम दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे हे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती औरंगाबाद जिल्हाध्यक्ष अतुल खंडगावकर यांनी दिली आहे. या मेळाव्यात अनुसूचित जातीचे आरक्षण वर्गीकरण करावे, बार्टीच्या धर्तीवर साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करावी, मातंग समाज विभाग स्थापन करुन शासनाने या समाजासाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी करावी, राज्यातील मातंग समाजावर सातत्याने अन्याय होत आहे. त्यांच्या मागण्या पूर्ण होत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मातंग समाजाच्या विविध मागण्या शासन दरबारी कुठलीही नोंद न घेता पडुन आहेत. राज्य सरकारने मातंग समाजाला न्याय द्यावा, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत.

यावेळी बोलताना प्रा. रामचंद्र भरांडे म्हणाले की, मातंग समाज मागे पडण्याचे कारण शिक्षणाच्या तसेच राजकारणाच्या अभावातही आहे.

आत्मोन्नतीसाठी आंदोलने करावी लागतात, याचे भान दुर्दैवाने मातंग समाजाला नाही. शासनाने आता मातंग समाजाला विकासाच्या प्रक्रियेत सामील करून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. शिक्षण, आरोग्य, शेती प्रश्न, घरकुल योजना, कर्ज, अनुदान अशा विकास योजनांचा त्यांना फायदा मिळवून दिला पाहिजे. ज्यांचे पोट भरले आहे, अशांनी आरक्षणाची सवलत मातंग बंधूंच्या वाट्याला कशी येईल याचाही विचार केला पाहिजे. दिवसेंदिवस गावगाड्यात मातंग समाजातील नागरिकांवर हल्ले होत आहेत, अनेकांना जीवे मारण्यात येत आहे, ही बाब पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी नाही, खरे तर मातंग समाजाच्या न्याय प्रश्नांकडे बुद्धाच्या करुणेतून पाहण्याची व ते सोडवण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. याचबरोबर मातंग समाजाने विशेषतः तरुणांनी हे जाणून घेतले पाहिजे की, शिक्षणाशिवाय कुठल्याही समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. माहिती तंत्रज्ञान व जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकायचे म्हणजे आधुनिक शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही. या अनुषंगाने शासनाने मातंग समाज स्पर्धेत उतरण्याच्या दृष्टीने सक्षम करण्याचा तसेच त्यांना शासकीय योजनांत सहभागी करून घेण्याचा जाणीवपूर्वक ठोस प्रयत्न करावा, मातंग समाजाच्या प्रश्नांकडे शासनाने जर जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले तर, त्याचे परिणाम शासनाला भोगावे लागतील, असा इशाराही प्रा. भरांडे यांनी दिला आहे.

या प्रथम दसरा मेळाव्यास प्रदेशाध्यक्ष नितीन पोळ, प्रदेश सरचिटणीस नामदेव गायकवाड, कामगार आघाडी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दादा पवार, व्ही.जी. डोईवाड, प्रा. पी. डी. गोणारकर, धोंडूपंत बनसोडे, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. दत्तराज गायकवाड, नागोराव कुडके, सचिन वाघमारे, अतुल खंडगावकर, हनमंत नामाकार, ॲड. सचिन बोईवार यांनी केले आहे.